

१९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | सोमवार । दि. ९ नोव्हेंबर २०२६ । अंक १५४ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

शिक्षकांना वयोमर्यादेचे बंधन नाही!

मुंबई : खासगी व्यवस्थापनांच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सरळसेवा नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा लागू नसल्याचे राज्य शासनाने स्पष्ट केले आहे. यामुळे वयाची अट आड येणाऱ्या उमेदवारांना दिलासा मिळाला आहे. यापूर्वीच्या शासन निर्णयांमुळे निर्माण झालेला संभ्रम दूर करण्यासाठी शिक्षण विभागाने हे स्पष्टीकरण दिले आहे. ७ फेब्रुवारी, ७ मार्च २०१९ आणि ११ ऑगस्ट २०२६ रोजीचे शासन निर्णय या नियुक्त्यांना लागू होणार नाहीत. अवर सचिव शरद माकणे यांनी यासंदर्भातील निर्णय जाहीर केला.

वेधक

उसाला ३६०० भाव द्या : शेट्टी

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यात उसाला १६ नोव्हेंबर पर्यंत ३६०० चा भाव जाहीर करावा अन्यथा सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर एक लाख शेतकऱ्यांचा धडक मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी दिला आहे. रविवारी पंढरपूरम ध्ये आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. आज दिवाळीचा पहिला दिवस असूनही शेकडो शेतकरी बैठकीसाठी उपस्थित होते. ऊस उत्पादकांना पहिली उचल ३६०० रुपये व साखरेचा दर ४५ रुपयांच्या पुढे गेला तर ७०/३० फॉर्म्युल्यानुसार जाहीर करण्याची मागणी राजू शेट्टींनी केली.

दोघे संशयित दहशतवादी ताब्यात

नवी दिल्ली : दिवाळीच्या पार्श्वभूमीवर जम्मू-काश्मीरमधील सुरक्षा यंत्रणांनी मोठी कारवाई करत कुलगाम येथे दोन संशयितांना शस्त्रे आणि ग्रेनेडसह ताब्यात घेतले आहे. गेल्या काही दिवसांपासून कुलगामसह दक्षिण काश्मीरमध्ये सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली असून, महामार्गावर तपासणी आणि ठिकठिकाणी शोधमोहीम राबविण्यात येत आहे. कुलगाम पोलिसांनी या दोघांबाबत अद्याप अधिकृत माहिती जाहीर केलेली नाही. महिनाभरापूर्वी लष्कर आणि सीआरपीएफच्या संयुक्त कारवाईत कुलगाममध्ये पाच संशयित दहशतवाद्यांना अटक करण्यात आली होती. त्यांच्याकडूनही शस्त्रे जप्त करण्यात आली होती.

कशेडी घाटात बिबट्याची दहशत

पोलादपूर : जुन्या कशेडी घाटातील येलंगेवाडीच्या हद्दीत बिबट्याने हल्ला करून पार्टे वाडी येथील शेतकऱ्याची दुभती गाय ठार केल्याची घटना रविवारी उघडकीस आली. ऐन दिवाळीत शेतकरी कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून परिसरातील ग्रामस्थ आणि गुराख्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पार्टेवाडी येथील तुकाराम रावजी जाधव उर्फ पार्टे यांनी रविवारी सकाळी गाय चरण्यासाठी रानात सोडली होती. दुपारपर्यंत गाय परत न आल्याने शोध घेतला असता ती येलंगेवाडीच्या हद्दीत अर्धवट खाल्लेल्या अवस्थेत आढळली. बिबट्याने तिच्यावर हल्ला केल्याचे स्पष्ट झाले. वनपाल बाजीराव पवार यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला असून, शेतकऱ्याला नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. रात्रीच्या वेळी बॅटरी व काठी सोबत ठेवावी, असे आवाहन वनविभागाने केले आहे.

'गोकुळ'साठी शेकापचा एल्गार!

- कोल्हापुरात सरकाविरोधात आज संघर्ष मोर्चा
- समविचारी आघाडीकडून मोर्चाचे आयोजन
- 'गोकुळ वाचवा, सहकार वाचवा'चा नारा
- दसरा चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयावर देणार धडक

। कोल्हापूर । प्रतिनिधी ।

गोकुळच्या निवडणुकीत सभासदांनी दिलेला कौल डावलून शासननियुक्त संचालकांच्या माध्यमातून सत्तेचे गणित बदलण्याचा प्रयत्न म्हणजे सहकारातील लोकशाहीची हत्या असल्याची टीका करत सम विचारी आघाडीने सोमवारी (दि. ९) कोल्हापुरात संघर्ष मोर्चाचे आयोजन केले आहे. या मोर्चात शेतकरी कामगार पक्ष सहभागी होणार असून, पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरातील शेकाप कार्यकर्ते रस्त्यावर उतरणार आहेत.

गोकुळच्या पंचवार्षिक निवडणुकीत आमदार सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीने २५ पैकी १३ जागा जिंकल्या, तर महायुतीला १२ जागा मिळाल्या. सभासदांनी मतदानातून आपला कौल स्पष्ट केला असतानाही राज्य सरकारने वार्षिक उलाढाल ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक असलेल्या 'अ' वर्ग सहकारी संस्थांवर शासननियुक्त संचालक नेमण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानुसार गोकुळमध्येही शासननियुक्त सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या सदस्यांना मतदानाचा अधिकार देण्याच्या निर्णयामुळे निवडून आलेल्या संचालकांच्या अधिकारांवर गदा येत असल्याचा आक्षेप समविचारी आघाडीने घेतला आहे. •➤पान २ वर



सरकारला धडा शिकविल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही : सतेज पाटील

गोकुळच्या निवडणुकीत भाजपला पराभव पचवता आलेला नाही. त्यामुळे शासनाच्या माध्यमातून चार सदस्यांची नियुक्ती करण्यात आली असून, आता त्यांनाही मतदानाचा अधिकार देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. हा प्रकार म्हणजे सभासदांनी दिलेला कौल डावलण्याचा प्रयत्न आहे. गोकुळच्या कारभारात लोकशाही प्रक्रियेवर गदा आणली जात आहे. गोकुळ हा दूध उत्पादकांचा संघ आहे; तो कोणाच्या राजकीय स्वार्थासाठी वापरू दिला जाणार नाही. गोकुळचा ब्रँड वाचवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. सरकारचा हा निर्णय रद्द करण्यास भाग पाडण्यासाठी संघर्ष मोर्चाच्या माध्यमातून आवाज उठवू, अशी भूमिका आमदार सतेज पाटील यांनी मांडली आहे.

> 'गोकुळ वाचवा, सहकार वाचवा! स्वाभिमानाचा एल्गार' या घोषणेखाली सोमवारी सकाळी १० वाजता ऐतिहासिक दसरा चौकातून मोर्चाला सुरुवात होणार आहे. हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार असून, दूध उत्पादक शेतकरी, गोकुळचे सभासद, नागरिक आणि शेकाप कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.
>
> – जयंत पाटील, शेकाप सरचिटणीस

अनैतिक संबंधाचा रक्तरंजित शेवट!

- मोहोपाड्यात ४६ वर्षीय महिलेचा गळा आवळून खून
- पतीचा सहकारीच निघाला मारेकरी

। रसायनी । प्रतिनिधी ।

प्रेमसंबंधातून सुरू झालेला वाद अखेर एका महिलेच्या जीवावर बेतल्याची धक्कादायक घटना मोहोपाड्यात उघडकीस आली आहे. लग्नासाठी सतत आग्रह धरत असल्याच्या रागातून २९ वर्षीय तरुणाने ४६ वर्षीय महिलेचा गळा आवळून खून केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. सुरुवातीला आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद झालेल्या या प्रकरणाचा शवविच्छेदन अहवाल आणि सीसीटीव्ही फुटेजमुळे उलगडा झाला. रसायनी पोलिसांनी संजय रामनारायण कुशवाहा याला अटक केली असून, या घटनेने मोहोपाडा परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरतीदेवी देवेंद्र फाटक (४६) या वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायतीजवळील साई दर्शन बिल्डिंगमधील रूम क्रमांक १०३ मध्ये राहत होत्या. आरोपी संजय कुशवाहा (२९, रा. परिश्रम बिल्डिंग, मरीआई मंदिराजवळ, मोहोपाडा) हा आरतीदेवी यांचे पती देवेंद्र फाटक यांच्यासोबत रिलायन्स कंपनीत सुपरवायझर म्हणून काम करत होता. या ओळखीतून त्याचे फाटक कुटुंबीयांकडे येणे-जाणे होते.

दि. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ७.३२ ते ८.३२ वाजण्याच्या दरम्यान आरोपीने महिलेच्या घराच्या परिसरात संशयास्पद हालचाली केल्याचे तपासात समोर आले. महिला कामावरून घरी परतत असताना आरोपीने तिचा पाठलाग केला आणि •➤पान २ वर

सह्याद्रीला हात लावाल तर नेस्तनाबूत करू!

- विवेकानंद पाटील यांचा टोरंटसह सरकारला इशारा
- प्रकल्प रद्द करण्याचे फडणवीसांना आव्हान



। नेरळ । प्रतिनिधी ।

विकासाला आमचा विरोध नाही; मात्र विकासाच्या नावाखाली सह्याद्री उद्ध्वस्त करणार असाल, तर २४ वर्षीय तरुणाचा इशारा सम जा, पुन्हा झाडे तोडायला आलात, तर तुम्हाला नेस्तनाबूत करू, अशा आक्रमक शब्दांत विद्यार्थी नेते विवेकानंद पाटील यांनी टोरंट कंपनी आणि सरकारला थेट आव्हान दिले. फडणवीस यांनी हा प्रकल्प रद्द करावा, आम्ही तुमचे कौतुक करू; मात्र सह्याद्रीच्या विनाशाला समर्थन देणार नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी कर्जत येथील सभेत मांडली. •➤पान ३ वर

पर्यावरण मंत्र्यांनी चार कायदे सांगावेत!

मंत्री पर्यावरणाच्या दृष्टीने सक्षम नाहीत, हे दिसून येत आहे. 'सह्याद्रीकडे चला' म्हणा आणि येथे येऊन २३ प्रकल्प रद्द करू, असे जाहीर आवाहन करण्याची वेळ आली आहे. पर्यावरणाची हानी रोखायची असेल, तर सरकारने प्रकल्प रद्द करण्याची भूमि का घ्यावी, अशी अपेक्षा विवेकानंद पाटील यांनी व्यक्त केली.

मराठी माणसाच्या उरावर पाय!

सरकारने मराठी माणसाच्या उरावर पाय दिला आहे आणि आता झाडांच्या उरावर पाय देण्यास सुरुवात केली आहे. कोल्हापूरच्या राधानगरी येथील मी असून, माझ्या भागात सह्याद्री वाचवण्यासाठी तुम्ही याल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कृषीवल दिवाळी अंकाचे शानदार प्रकाशन



शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे, विद्यार्थी नेते विवेकानंद पाटील यांच्या हस्ते अनावरण

। अलिबाग । प्रतिनिधी ।

शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला आणि युवकांच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडणाऱ्या दैनिक कृषीवलच्या दिवाळी अंकाचे कर्जत आणि अलिबाग येथे उत्साहात प्रकाशन करण्यात आले. शनिवारी (दि. ७) कर्जत येथे प्रसिद्ध अभिनेते तथा पर्यावरणप्रेमी सयाजी शिंदे आणि विद्यार्थी नेते विवेकानंद पाटील यांच्या हस्ते, तर रविवारी (दि. ८) अलिबाग येथे शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस तथा मा. आमदार जयंत पाटील यांच्या हस्ते अंकाचे प्रकाशन झाले.

सह्याद्री वाचवण्यासाठी आणि पर्यावरण रक्षणासाठी सुरू असलेल्या 'सेव्ह सह्याद्री' चळवळीच्या कर्जतमधील सभेत शनिवारी कृषीवल दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी कृषीवलच्या कार्यकारी संपादक माधवी सावंत, जिल्हा प्रतिनिधी प्रमोद जाधव, कर्जत प्रतिनिधी संजय गायकवाड, नेरळ प्रतिनिधी संतोष पेरणे, कर्जत तालुका पर्यावरण बचाव समितीचे ॲड. कैलास मोरे, शेकाप महिला कार्यकर्त्या स्वीटी बार्शी आदी मान्यवरांसह सह्याद्रीप्रेमी, शेतकरी आणि पर्यावरण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, रविवारी अलिबाग येथे शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या हस्ते दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी कृषीवलच्या कार्यकारी संपादक माधवी सावंत, वरिष्ठ उपसंपादक राकेश लोहार, उपसंपादक वैभव पाटील, उपसंपादक संतोष राऊळ, आर्टिस्ट केदार गुरव, मानसी गोतावडे, आरोही मांडवकर, डिजिटलच्या सायली पाटील, भाग्यश्री पाटील, आणि मंजुळा कावजी उपस्थित होत्या.

गेली ९० वर्षे पत्रकारितेची परंपरा जपणाऱ्या कृषीवलने शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला आणि युवकांच्या प्रश्नांना व्यासपीठ मिळवून दिले आहे. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि जनतेच्या प्रश्नांना निर्भीडपणे वाचा फोडणे हीच कृषीवलची ओळख राहिली आहे. याच परंपरेला पुढे नेत यंदाच्या दिवाळी अंकात 'मोर्चे, आंदोलने, जनसंघर्ष' या विषयाच्या माध्यमातून गेल्या वर्षभरातील विविध आंदोलनांचा वेध घेण्यात आला आहे. आंदोलनांची पार्श्वभूमी, त्यामागील प्रश्न आणि समाजावर उमटलेले पडसाद यांचे सविस्तर विश्लेषण •➤पान २ वर

मान्यवरांकडून कौतुक!

'मोर्चे, आंदोलने, जनसंघर्ष' या विषयाची मांडणी करताना कृषीवलने जनतेच्या प्रश्नांना दिलेले प्राधान्य आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची पत्रकारितेतील परंपरा यंदाच्या दिवाळी अंकातून पुन्हा अधोरेखित झाली आहे. कर्जतमधील प्रकाशन सोहळ्यात अभिनेते सयाजी शिंदे आणि विद्यार्थी नेते विवेकानंद पाटील यांनी अंकातील विषयांचे आणि कृषीवलच्या भूमिकेचे कौतुक केले. तर, अलिबागमधील प्रकाशनावेळी जयंत पाटील यांनीही कृषीवलच्या पत्रकारितेच्या परंपरेचा गौरव केला. जनआंदोलनांना व्यासपीठ देणारा आणि समाजातील ज्वलंत प्रश्न मांडणारा हा अंक वाचकांसाठी महत्त्वपूर्ण ठरेल, अशी भावना यावेळी व्यक्त झाली.

खालापूरमध्ये गावठी कट्ट्यांसह तरुण जेरबंद



। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर गावठी कट्टे आणि जिवंत काडतुसे घेऊन फिरणाऱ्या तरुणाला स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने बेड्या ठोकल्या आहेत. खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील प्रीती पॅलेस हॉटेलसमोर सापळा रचून केलेल्या या कारवाईत दोन गावठी कट्टे, दोन जिवंत काडतुसे आणि एर्टिगा कार असा एकूण ७ लाख ५२ हजार रुपये •➤पान २ वर

- दोन कट्टे, दोन जिवंत काडतुसे आणि एर्टिगा कार जप्त
- स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेची महामार्गावर कारवाई

स्कॉर्पिओच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

। रसायनी । प्रतिनिधी ।

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर नढाळ गावच्या हद्दीत मॅकडोनाल्डसमोर दुचाकी आणि महिंद्रा स्कॉर्पिओ यांच्यात झालेल्या भीषण अपघातात गंभीर जखमी झालेल्या दुचाकीस्वाराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. स्कॉर्पिओच्या अज्ञात चालकाने भरधाव आणि निष्काळजीपणे वाहन चालवून दुचाकीला जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चौक येथील ब्राह्मण आळी, विठ्ठल मंदिराजवळ राहणारे दुचाकीस्वार हिरो पॅशन मोटारसायकल (क्र. एमएच-०६-एएम-०९६२) वरून बारवाई-पनवेल •➤पान २ वर

सोने-चांदीसह डायमंड दागिन्यांनाही पसंती | डायमंड ज्वेलरीकडेही तरुणाईचा कल

लक्ष्मीपूजनाला सराफ बाजारात झळाळी

। पनवेल । प्रतिनिधी ।

दिवाळीचा उत्साह, लक्ष्मीपूजनाचा शुभमुहूर्त आणि सोन्याच्या दरात झालेली घसरण या तिहेरी योगामुळे पनवेल, अलिबागमधील सराफ बाजार रविवारी ग्राहकांच्या गर्दीने फुलून गेला. सकाळपासूनच सोने-चांदी खरेदीसाठी नागरिकांनी सराफांच्या दुकानांमध्ये गर्दी केली होती. सोन्याची नाणी, आकर्षक दागिने, चांदीच्या वस्तूंपासून डायमंड ज्वेलरीपर्यंत विविध प्रकारच्या दागिन्यांना ग्राहकांची पसंती मिळाली. विशेष म्हणजे, सोन्याचे दर कमी झाल्याच्या पार्श्वभूमीवर अनेकांनी नियोजित खरेदीला प्राधान्य दिले. त्यामुळे लक्ष्मीपूजनाच्या मुहूर्तावर सराफ बाजारात चांगली उलाढाल झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.



भारतीय संस्कृतीत दिवाळी आणि सोने-चांदी खरेदीचे नाते जुने आहे. धनत्रयोदशीपासून लक्ष्मीपूजनापर्यंत मौल्यवान धातूंच्या खरेदीला विशेष महत्त्व असते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी घरात सोने-चांदी आणणे शुभ मानले जाते. याच श्रद्धेतून अनेक कुटुंबांनी खरेदीचे नियोजन केले होते. काहींनी गुंतवणुकीचा पर्याय म्हणून सोन्याची नाणी घेतली, तर काहींनी पत्नी, मुले आणि कुटुंबियांसाठी दागिन्यांची खरेदी केली. यंदाच्या खरेदीत पारंपरिक दागिन्यांसोबत आधुनिक डिझाइनलाही •➤पान २ वर

सोन्याचे आजचे दर

२४ कॅरेट सोने : १,४३,१८० रुपये प्रति १० ग्रॅम.

२२ कॅरेट सोने : १,३१,६७० रुपये प्रति १० ग्रॅम.

चांदी : १,९१,००० रुपये प्रति किलो.

> लक्ष्मीपूजनाच्या मुहूर्तावर ग्राहकांनी सोने खरेदीला सकाळपासूनच गर्दी केली होती. सोन्याची नाणी घेण्याकडे ग्राहकांचा जास्त कल दिसून आला. तसेच आजचा मुहूर्त साधण्यासाठी आधीपासून अनेकांनी दागिन्यांची बुकिंग केली होती. एकंदरीत आपल्या ऐपतीनुसार सोने खरेदी केली आहे.
>
> – प्रशांत म्हात्रे, शाखा व्यवस्थापक, वामन हरी पेठे ज्वेलर्स, अलिबाग

उटण्याचा राजकीय सुगंध यंदा गायब

- नगरसेवक झाल्यावर हात आखडता
- मतदारांना खुश करण्यासाठी भेटवस्तूंची रेलचेल

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

निवडणूक जवळ आली की मतदारराजा हा प्रत्येक इच्छुक उमेदवारासाठी किती महत्त्वाचा असतो, याचा प्रत्यय पनवेल महानगरपालिका हद्दीत मागील वर्षीच्या दिवाळीत आला होता. त्यावेळी निवडणुकीच्या तयारीत असलेल्या अनेक इच्छुकांनी आपल्या प्रभागातील मतदारांच्या घरी दिवाळीच्या शुभेच्छांसोबत उटण्याची पाकिटे आणि विविध भेटवस्तू पाठवून मतदारांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता. काही ठिकाणी तर भेटवस्तूंची चांगलीच रेलचेल पाहायला मिळाली होती.

मात्र, यंदाचे चित्र अगदी उलटे असल्याचे दिसून आले. मागील वर्षी मतदारांच्या घरी आवर्जून पोहोचणारी उटण्याची पाकिटे यंदा मात्र गायब झाली आहेत. विशेष म्हणजे, मागील निवडणुकीत निवडून आलेले नगरसेवक आणि त्यावेळी निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेले अनेक चेहरे यांनी यंदा दिवाळीच्या निमित्ताने हात आखडता घेतल्याचे चित्र आहे. मतदारांच्या घरी साधे उटण्याचे पाकीटही पोहोचले नसल्याची चर्चा प्रभागांमध्ये रंगू लागली आहे.

निवडणुकीपूर्वी दिवाळीच्या शुभेच्छांसोबत भेटवस्तू देण्यासाठी पुढाकार घेणारे इच्छुक आता निवडून आल्यानंतर मात्र या परंपरेपासून दूर का गेले, असा प्रश्न नागरिकांकडून उपरोधिकपणे उपस्थित केला जात आहे. निवडणुकीच्या काळात मतदारांची आठवण ठेवणारे नेते निवडणूक संपल्यानंतर दिवाळीच्या सणातही मतदारांना विसरले का, असा टोला नागरिकांमधून लगावला जात आहे.

राजकारण्यांच्या वागण्यात बदल

दिवाळीला भेटवस्तू देणे ही कोणाची जबाबदारी नसली तरी निवडणुकीच्या आधी आणि नंतरच्या वागण्यात पडलेला फरक मात्र चर्चेचा विषय ठरला आहे. त्यामुळे यंदा पनवेलकरांच्या दिवाळीत फटाके, फराळ आणि आनंद तर होता; पण राजकीय उटण्याचा सुगंध मात्र गायब झाल्याची मिश्किल टिप्पणी ऐकायला मिळत आहे.

सयाजी शिंदेंच्या आवाहनानंतर जलआंदोलन स्थगित

दहाव्या दिवशी बादल घुडेकर यांचा निर्णय

| कर्जत | प्रतिनिधी |

टोरंट पॉवरच्या प्रस्तावित जलविद्युत प्रकल्पासाठी साय डोंगर परिसरात सुरू असलेल्या वृक्षतोडीविरोधात पेज नदीच्या पात्रात उतरून सुरू केलेल्या जलआंदोलनाला अखेर दहाव्या दिवशी तात्पुरती स्थगिती देण्यात आली. सिनेअभिनेते आणि ज्येष्ठ पर्यावरणप्रेमी सयाजी शिंदे यांनी आंदोलनकर्ते बादल घुडेकर यांच्या प्रकृतीची काळजी घेत आंदोलन थांबविण्याचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला मान देत घुडेकर यांनी आंदोलन तूर्तास स्थगित केले आहे. मात्र, वृक्षतोड पुन्हा सुरू झाल्यास राज्यभरातील हजारो पर्यावरणप्रेमींना सोबत घेऊन आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.


● (छायाचित्र : संजय गायकवाड)

टोरंट पॉवरच्या प्रस्तावित प्रकल्पासाठी साय डोंगर परिसरात सुरू असलेल्या वृक्षतोडीचा मुद्दा गेल्या काही दिवसांपासून ऐरणीवर आला आहे. या वृक्षतोडीमुळे पर्यावरण, जैवविविधता आणि नैसर्गिक जलस्रोतांवर गंभीर परिणाम होण्याची भीती पर्यावरणप्रेमी व्यक्त करीत आहेत. या विरोधात बादल घुडेकर यांनी विविध जिल्ह्यांतील पर्यावरणप्रेमींना एकत्र आणत पेज नदीच्या पात्रात उतरून जलआंदोलन सुरू केले होते. नदीच्या पाण्यात बसून सुरू असलेल्या या आंदोलनातून शासन आणि संबंधित यंत्रणांचे लक्ष साय डोंगरातील वृक्षतोडीकडे वेधण्याचा प्रयत्न करण्यात येत होता.

शुक्रवार, दि. ७ नोव्हेंबर रोजी आंदोलनाचा दहावा दिवस होता. याच दिवशी साय डोंगर परिसरातील वृक्षतोडीची पाहणी करण्यासाठी आलेले अभिनेते आणि पर्यावरणप्रेमी सयाजी शिंदे यांनी आंदोलनस्थळी भेट दिली. त्यांनी बादल घुडेकर आणि अन्य आंदोलनकर्त्यांशी संवाद साधला. सलग अनेक दिवस नदीच्या पाण्यात बसून आंदोलन केल्यामुळे घुडेकर यांच्या प्रकृतीवर परिणाम होण्याची शक्यता असून त्यांच्या पायांनाही इजा झाल्याचे शिंदे यांच्या निदर्शनास आले. आंदोलनापेक्षा आंदोलनकर्त्यांचे आरोग्य महत्त्वाचे असल्याचे सांगत त्यांनी घुडेकर यांनी आंदोलन थांबवावे, असे भावनिक आवाहन केले.

सयाजी शिंदे यांच्या आवाहनाचा मान राखत बादल घुडेकर यांनी जलआंदोलनाला तात्पुरती स्थगिती देण्याचा निर्णय घेतला. मात्र, ही माघार नसून पुढील लढ्यासाठी घेतलेली विश्रांती असल्याची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. साय डोंगर परिसरातील वृक्षतोड पुन्हा सुरू झाल्यास जलआंदोलन नव्या ताकदीने उभारण्यात येईल. त्यासाठी कर्जतपुरते मर्यादित न राहता राज्यभरातील हजारो पर्यावरणप्रेमींना एकत्र आणून संघर्ष तीव्र केला जाईल, असा इशाराही घुडेकर यांनी दिला.

दरम्यान, सयाजी शिंदे यांच्या आवाहनानंतर जलआंदोलनाला तात्पुरता विराम मिळाला असला, तरी साय डोंगरातील वृक्षतोड आणि टोरंट प्रकल्पाचा पर्यावरणीय प्रश्न कायम आहे. आंदोलन स्थगित झाले असले, तरी साय डोंगराच्या संरक्षणासाठीचा लढा थांबलेला नाही. आता वृक्षतोडीबाबत शासन आणि संबंधित यंत्रणा काय भूमिका घेतात, याकडे परिसरातील नागरिक आणि पर्यावरणप्रेमींचे लक्ष लागले आहे.

७२ लाख ९८ हजारांची फसवणूक

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

महिनाभरात गुंतवणुकीची रक्कम दुप्पट करून देण्याचे आमिष दाखवून चौघांकडून तब्बल ७२ लाख ९८ हजार रुपये स्वीकारून फसवणूक केल्याप्रकरणी सुप्रिया मंगेश पाटील (३२, रा. कोप्रोली, उरण) हिच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी स्वराज प्रदीप म्हात्रे (रा. कोंढरी पाडा, करंजा, उरण) यांना २० जुलै रोजी सुप्रिया पाटील हिने महिनाभरात पैसे दुप्पट करून देण्याचे आमिष दाखवले होते. यासंदर्भात ओरियन मॉल, पनवेल येथे बैठक घेऊन गुंतवणुकीची रक्कम सुरक्षित राहण्याचीही हमी देण्यात आली. त्यानुसार म्हात्रे यांनी ८ सप्टेंबर रोजी द्रोणागिरी येथे चार लाख रुपये रोख, तर ९ सप्टेंबर रोजी ९८ हजार रुपये ऑनलाइन असे एकूण चार लाख ९८ हजार रुपये दिले. याशिवाय कृष्णा काशिनाथ पाटील यांच्याकडून ६१ लाख, अजय रमेश गावंड यांच्याकडून तीन लाख आणि प्रसाद चंद्रकांत जोशी यांच्याकडून चार लाख रुपये स्वीकारण्यात आले. मात्र, कोणालाही परतावा अथवा मूळ रक्कम परत न मिळाल्याने फसवणूक झाल्याचे उघड झाले. याप्रकरणी चार नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी महिलेला अद्याप अटक झालेली नाही.

आदिवासी, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

● सोशल रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशनचा उपक्रम

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

दिवाळीचा आनंद समाजातील गरजू आणि वंचित घटकांपर्यंत पोहोचावा, या सामाजिक भावनेतून आधार ए सोशल रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या वतीने आदिवासी व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. टेंबोडे येथील वाघऱ्याचीवाडी येथे हा उपक्रम राबविण्यात आला.



पनवेल परिसरातील आदिवासी भागातील गरजू विद्यार्थी, वंचित घटकांतील मुले तसेच कारागृहातील बंदी महिलांच्या मुलांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. यावेळी महिला आणि मुलांना दिवाळी फराळ, वह्या, स्कूल बॅग, टी-शर्ट, पेन्सिल बॉक्स आदी शैक्षणिक व उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले.

दिवाळीच्या सणानिमित्त मिळालेल्या या भेटवस्तूंमुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फ ुलला होता. शिक्षणासाठी आवश्यक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांनी सम ाधान व्यक्त केले. तसेच उपस्थित पालकांनी आधार फाउंडेशनच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.

या उपक्रमाची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुनील शिरीषकर यांनी दिली. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष अजय कदम, सहसचिव अभिनव येलवे, खजिनदार रोहित देखणे, सदस्य राहुल तेलंग, पंकज म ोहिते यांच्यासह मोठ्या संख्येने आदिवासी विद्यार्थी, मुले आणि पालक उपस्थित होते. समाजातील गरजू घटकांना सणासुदीच्या काळात आधार देण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा फाऊंडेशनचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.


दीपावलीनिमित्त लक्ष्मी मातेची पूजा करताना. (छायाचित्र : समीर मालोदे)

नेताजी पालकर मंडळातर्फे ४१ वी किल्ले स्पर्धा

| रसायनी | प्रतिनिधी |

सरनौबत नेताजी पालकर यांची जन्मभूमी आणि आध्यात्मिक गुरू नाना महाराज हनुमंते यांची कर्मभूमी असलेल्या चौक नगरीत ऐतिहासिक वारसा जपण्याचा उपक्रम यंदाही उत्साहात राबविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची, स्वराज्याच्या इतिहासाची आणि गड-किल्ल्यांच्या महत्त्वाची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने चौक येथील नेताजी पालकर मंडळातर्फे यंदा ४१ व्या किल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

चौक शहरात गेली ४५ वर्षे कार्यरत असलेल्या नेताजी पालकर मंडळाने गेल्या चार दशकांपासून ही परंपरा जपली आहे. इयत्ता पहिली ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या या स्पर्धेतून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्याबरोबरच त्यांना गड-किल्ल्यांचा इतिहास, छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य आणि स्वराज्याच्या कार्याची माहिती मिळते.

■ पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांना सहभागाची संधी

यंदाची स्पर्धा तिनघर ते तारापूर (संपूर्ण चौक शहर), नानिवलीसह नवीन चौक, हातनोली, धारणी आणि वावर्ले या विभागांत आयोजित करण्यात आली आहे. मंगळवार, दि. १० नोव्हेंबर २०२६ रोजी बलिप्रतिपदेच्या दिवशी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत किल्ल्यांचे परीक्षण होणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही निसर्ग मित्र, पनवेलचे धनंजय मदन आणि त्यांचे सहकारी परीक्षक म्हणून किल्ल्यांचे परीक्षण करणार आहेत.

या स्पर्धेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ऐतिहासिक कार्याला उजाळा देतानाच गड-किल्ल्यांचे संवर्धन आणि इतिहास जतन करण्याची प्रेरणा घ्यावी, असे आवाहन नेताजी पालकर मंडळाचे संघटक रायगडभूषण यशवंत सकपाळ (९३२६१५३७३७), इतिहास अभ्यासक अशोक मोरे (८९७५७६०६६०) आणि स्पर्धाप्रमुख भूषण पिंगळे (९३२६६६७४५९) यांनी केले आहे.

साळाव-मुरुड रस्त्यावर विकासकामांचा बोजवारा

| मुरुड | प्रतिनिधी |

मुरुड-जंजिरा किल्ला आणि काशीद समुद्रकिनाऱ्यामुळे पर्यटकांचे आकर्षण ठरलेल्या मुरुड तालुक्यात सध्या पर्यटकांचे स्वागत निसर्गसौंदर्याऐवजी खोदलेले रस्ते आणि खडीच्या ढिगाऱ्यांनी होत आहे. राष्ट्रीय रस्ते विकास महामंडळातर्फे सुरू असलेल्या साळाव-मुरुड मार्गाच्या काँक्रिटीकरणाच्या कामामुळे वाहनचालक आणि स्थानिक ग्राम स्थांची मोठी गैरसोय होत आहे. अनेक ठिकाणी महिनोन्महिने खोदाई तशीच ठेवण्यात आली असून, धोक्याचे इशारे, दिशादर्शक फलक आणि काम करणाऱ्या कंपनीची माहिती देणारा फलकही नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.


भागांतून पर्यटक मुरुड आणि काशीदकडे येत आहेत. त्यामुळे या मार्गावरील वाहनांची वर्दळ वाढली आहे. मात्र, काशीद रस्त्यावरील यू-टर्न, काशीद, चिकणी, सर्वे, दांडा, नांदगाव, आयुष हॉस्पिटल, मजगाव आणि विहर परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजूंना खोदाई करण्यात आली आहे. काही ठिकाणी खोदलेला भाग बुजवलेला नाही, तर रस्त्यालगत खडीचे ढिगारे पडून आहेत. त्याम ुळे समोरून येणाऱ्या वाहनांना बाजू देताना दुचाकीस्वारांसह लहान वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे.

रस्त्याचे काँक्रिटीकरण कोणती कंपनी करीत आहे, ठेकेदार कोण, काम पूर्ण करण्याची मुदत किती आणि जबाबदार अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक काय, याची माहिती देणारा फलकही परिसरात दिसत नाही. सार्वजनिक निधीतून सुरू असलेल्या कामात पारदर्शकतेचा अभाव जाणवत असून, कामातील त्रुटींबाबत तक्रार नेमकी कोणाकडे करायची, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

■ खोदाई, खडीचे ढिगारे आणि दिशादर्शक फलकांचा अभाव

■ पर्यटकांसह स्थानिकांचा जीव धोक्यात

खोदाई सुरू असलेल्या ठिकाणी धोक्याचे इशारे, दिशादर्शक फलक, बॅरिकेड्स आणि रात्री दिसणारी प्रकाशव्यवस्था असणे आवश्यक आहे. मात्र, अनेक ठिकाणी या प्राथमिक उपाययोजनांचाही अभाव आहे. विशेषतः मार्गाची माहिती नसलेल्या पर्यटकांना रात्रीच्या वेळी अचानक समोर येणारी खोदाई किंवा अडथळे लक्षात न आल्यास गंभीर अपघात होण्याची शक्यता आहे.

साळाव-मुरुड मार्ग हा स्थानिकांच्या दैनंदिन प्रवासासह तालुक्याच्या पर्यटन आणि आर्थिक उलाढालीसाठी महत्त्वाचा आहे. त्यामुळे या मार्गावरील गैरसोयीचा फटका पर्यटक, हॉटेल व्यावसायिक, दुकानदार आणि स्थानिकांना बसत आहे. रस्त्याचे काँक्रिटीकरण स्वागतार्ह असले, तरी विकासकामांच्या नावाखाली नागरिकांच्या सुरक्षिततेशी तडजोड होऊ नये. संबंधित यंत्रणेने तातडीने पाहणी करून खोदाई सुरक्षित करावी, खडीचे ढिगारे हटवावेत, धोकादायक ठिकाणी बॅरिकेड्स व दिशादर्शक फलक लावावेत आणि काम करणाऱ्या कंपनीसह ठेकेदार व कामाची मुदत स्पष्ट करणारा माहिती फलक उभारावा, अशी मागणी वाहनचालक आणि ग्रामस्थांकडून होत आहे.

पान १ वरुन

'गोकुळ'साठी शेकापचा एल्गार!

सरकारचा हा निर्णय सहकाराच्या मूळ तत्त्वांनाच हरताळ फासणारा असल्याची भूमिका शेतकरी कामगार पक्षाने घेतली आहे. निवडणुकीत बहुमताचा कौल न मिळाल्यानंतर शासनाच्या अधिकारांचा वापर करून सत्तेचा मार्ग मोकळा करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला जात आहे. सहकारी संस्थांमध्ये सभासदांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींनाच निर्णय घेण्याचा अधिकार असताना सरकारने हस्तक्षेप करून लोकशाही प्रक्रियेत अडथळे निर्माण करू नयेत, अशी शेकापची भूमिका आहे. गोकुळ हा केवळ दूध संघ नसून हजारो दूध उत्पादक शेतकरी, सभासद आणि त्यांच्या कुटुंबांच्या आर्थिक हिताशी जोडलेली संस्था आहे. त्यामुळे गोकुळच्या कारभारात सरकारी हस्तक्षेप वाढवून सभासदांचे अधिकार कमी करण्याचा प्रयत्न झाल्यास तो सहन केला जाणार नाही. गोकुळचे अस्तित्व, दूध उत्पादकांचे हित आणि सहकारातील लोकशाही मूल्ये टिकवण्यासाठी सभासदांनी एकजुटीने संघर्षात उतरावे, असे आवाहन जयंत पाटील यांनी केले आहे.

अनैतिक संबंधाचा रक्तरंजित शेवट!

घरात घुसून अज्ञात कारणावरून तिचा गळा आवळून खून केल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर रसायनी पोलीस ठाण्यात सुरुवातीला आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र, शवविच्छेदन अहवालात महिलेचा मृत्यू गळा दाबल्यामुळे झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी तपासाला वेग दिला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता संजय कुशवाहा हा महिलेच्या घरात ये-जा करताना दिसून आला. या पुराव्याच्या आधारे पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली. यावेळी त्याने हत्येची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांच्या चौकशीत आरोपीने दिलेल्या माहितीनुसार, त्याचे आणि मृत महिलेचे प्रेमसंबंध होते. महिला वारंवार लग्नासाठी आग्रह धरत होती; मात्र आरोपीचे आधीच लग्न झाले असल्याने त्याने लग्नास नकार दिला होता. याच कारणावरून दोघांमध्ये वाद होत होते. या वादातूनच महिलेचा गळा आवळून खून केल्याचे आरोपीने कबूल केल्याचे पोलिसांनी सांगितले.

याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला अटक करण्यात आली आहे. खालापूर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल नेहूल यांच्या मार्गदर्शनाखाली रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ तपास करीत आहेत. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मंगेश बाचकर करीत आहेत.

कृषीवल दिवाळी अंकाचे शानदार प्रकाशन

अंकात करण्यात आले आहे. यंदाच्या अंकात अनेक मान्यवरांचे अभ्यासपूर्ण लेख समाविष्ट आहेत. शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी लढणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाचा आजवरचा जनआंदोलनातील संघर्ष कृषीवलच्या कार्यकारीसंपादक माधवी सावंत यांनी आपल्या लेखातून म ांडला आहे. अदानीच्या स्मार्ट मीटरमधून सर्वसामान्यांची फसवणूक करण्याचे सत्ताधाऱ्यांचे षड्यंत्र अलिबागच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांनी लेखातून उघड केले आहे. तरुणाई जेव्हा पेटून उठते, तेव्हा सत्तेलाही तिच्या ताकदीपुढे झुकावे लागते, या विषयावर सल्लागार संपादक प्रसाद केरकर यांनी भाष्य केले आहे. विद्यार्थी व्यवस्थेला प्रश्न विचारू लागला, तर त्या व्यवस्थेची झोप उडवण्याची ताकद त्याच्यात असते, हे एमपीएससीच्या पुण्यातील आंदोलनाचा चेहरा बनलेल्या विद्यार्थी नेते विवेकानंद पाटील यांनी आपल्या लेखातून परखडपणे मांडले आहे. सध्या देशभरात चर्चेत असलेल्या आणि पर्यावरणाच्या हानीशी जोडल्या गेलेल्या कर्जतच्या टोरंट प्रकल्पामुळे परिसराचे होणारे नुकसान पत्रकार संतोष पेरणे यांनी लेखातून मांडले आहे. आंदोलनांदरम्यान कायदा-सुव्यवस्था राखताना पोलिसांची भूमिका कशी असावी, यावर सेवानिवृत्त पोलीस अधीक्षक डॉ. संजय अपरांती यांनी अभ्यासपूर्ण लेख लिहिला आहे.

यंदाच्या अंकाचे आणखी एक खास आकर्षण म्हणजे अलिबाग तालुक्यातील रांजणखार शेफ सुनील माळी यांचा प्रेरणादायी प्रवास आणि त्यांच्या खास पाककृती. इन्स्टाग्रामवर 'शेफ सुनील' म्हणून ओळख निर्माण केलेल्या सुनील माळी यांना एकेकाळी महाविद्यालयाची फी भरण्यासाठीही पैसे नव्हते. मात्र, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी परदेशात जाऊन शिक्षण घेतले आणि आज ते हेड शेफ म्हणून कार्यरत आहेत. संघर्षातून यश मिळवण्याचा त्यांचा प्रवास आणि त्यांच्या खास रेसिपीज वाचकांसाठी दिवाळी अंकात देण्यात आल्या आहेत. याशिवाय शरद कोरडे आणि अनिल जावकर यांच्या कथा, तसेच विविध आंदोलनांवर परखड भाष्य करणाऱ्या कवितांचाही अंकात समावेश आहे. विविध लेख, कथा, कविता, आंदोलनांचा वेध आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचे प्रवास अशा वैविध्यपूर्ण साहित्यामुळे कृषीवलचा यंदाचा दिवाळी अंक वाचकांसाठी विशेष वाचनीय ठरणार आहे.

...दुचाकीस्वाराचा मृत्यू

येथून चौक-खालापूरच्या दिशेने मुंबई-पुणे जुन्या महामार्गाने प्रवास करीत होते. यावेळी नढाळ गावच्या हद्दीतील मॅकडोनाल्डसमोर महिंद्रा स्कॉर्पिओ (क्र. एमएच-४६-सीई-७९४०) वरील अज्ञात चालकाने वाहन अविचाराने, हयगयीने, बेदरकारपणे आणि अतिवेगाने चालवून दुचाकीला जोरदार धडक दिली.

या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. याप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघाताचा पुढील तपास श्रेणी पोलीस उपनिरीक्षक बहाडकर करीत आहेत.

खालापूरमध्ये गावठी कट्ट्यांसह तरुण जेरबंद

किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सहाय्यक फौजदार संदीप पाटील यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने ही कारवाई केली. यावेळी शुभम उल्हास पाटील (२८, व्यवसाय चालक, रा. पार आळी, शहापूर, ता. अलिबाग, जि. रायगड) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून दोन गावठी बनावटीचे कट्टे, दोन जिवंत काडतुसे आणि एमएच ४६ सीवाय ४३०० क्रमांकाची एर्टिगा कार जप्त करण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या शुभम पाटील याच्याविरोधात यापूर्वी पोयनाड पोलीस ठाण्यातही गुन्हा दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील, सहाय्यक फौजदार संदीप पाटील, पोलीस हवालदार रवींद्र मुंडे, प्रतीक सावंत, शरद फरांदे, रणजितसिंह खराडे आणि पोलीस शिपाई प्रदीप खरात यांच्या पथकाने केली. या प्रकरणाचा पुढील तपास खालापूर पोलीस करीत आहेत.

लक्ष्मीपूजनाला सराफ बाजारात झळाळी

पसंती मिळाली. महिलांनी नेकलेस, बांगड्या, अंगठ्या, कानातील दागिने अशा विविध प्रकारांची निवड केली. तर तरुणाईमध्ये डायमंड ज्वेलरीचे आकर्षण दिसून आले. काही ग्राहकांनी चांदीची नाणी, लक्ष्मी-गणेशाच्या मूर्ती आणि पूजेसाठी आवश्यक असलेल्या चांदीच्या वस्तू खरेदी केल्या. पारंपरिक श्रद्धा आणि आधुनिक आवड यांचा सुंदर मिलाफ सराफ बाजारात पाहायला मिळाला. गेल्या काही दिवसांतील सोन्याच्या दरातील चढ-उताराने ग्राहकांचे लक्ष वेधले आहे. ६ नोव्हेंबरच्या तुलनेत ७ नोव्हेंबरला सोन्याच्या दरात मोठी घसरण नोंदवली गेली. त्यामुळे खरेदीसाठी ही संधी असल्याचे मानून अनेक ग्राहकांनी दिवाळीचा मुहूर्त साधला. ८ नोव्हेंबरला दरात किरकोळ वाढ झाली असली, तरी आधीच्या घसरणीमुळे बाजारात खरेदीचा उत्साह कायम होता.

लक्ष्मीपूजनाच्या मुहूर्तावर पनवेलच्या सराफ बाजारात दिसलेली गर्दी ही केवळ दागिन्यांच्या खरेदीपुरती मर्यादित नव्हती, तर परंपरा, गुंतवणूक आणि सणाचा आनंद यांचा संगम होती. महागाई आणि वाढत्या सोन्याच्या किमतींचे आव्हान असतानाही आपल्या ऐपतीनुसार सोने-चांदी खरेदी करण्याकडे नागरिकांचा कल दिसून आला. दिवाळीच्या रोषणाईत सराफ बाजारातील सोन्याची झळाळीही विशेष लक्षवेधी ठरली. सोन्या-चांदीच्या पारंपरिक दागिन्यांसोबत डायमंड ज्वेलरीलाही ग्राहकांकडून पसंती मिळत आहे. आकर्षक डिझाइन, नवनवीन प्रकार आणि आधुनिक फॅशन यामुळे तरुण महिला तसेच जोडप्यांकडून डायमंड दागिन्यांची खरेदी केली जात असल्याचे चित्र सराफ बाजारात पाहायला मिळाले.

अजय देवगणने कर्जतमध्ये खरेदी केली दोन एकर जमीन

| नेरळ | प्रतिनिधी |

'सिंघम'फेम प्रसिद्ध अभिनेते अजय देवगण यांनी कर्जत तालुक्यातील भोईरवाडी येथील आपल्या देवगण फार्मच्या शेजारील दोन एकर पाच गुंठे शेतजमीन खरेदी केली आहे. या जमिनीसाठी त्यांनी तब्बल एक कोटी ६० लाख रुपये मोजले असून, सरकारी मूल्यांकनापेक्षा सुमारे ९८ लाख रुपये अधिक देत शेतकऱ्याला बाजारभावाचा मोबदला दिला आहे.

■ सरकारी मूल्यांकनापेक्षा तब्बल ९८ लाख रुपये अधिक मोजले

■ शेतकऱ्याला बाजारभावाचा मोबदला

कर्जत तालुक्यातील निसर्गरम्य आणि प्रदूषणमुक्त वातावरणामुळे अनेक उद्योजक, चित्रपट अभिनेते आणि खेळाडूंनी येथे फार्महाऊस उभारले आहेत. अजय देवगण यांचे वडील वीरू देवगण यांनी १९९० च्या दशकात भोईरवाडी येथे सुमारे २८ एकर क्षेत्रावर देवगण फार्म उभारला होता. तेव्हापासून देवगण कुटुंबाचे या गावाशी जवळचे नाते आहे. वीरू देवगण यांच्या निधनानंतर अजय देवगण यांच्या आई फार्मची जबाबदारी सांभाळत आहेत.

देवगण फार्मच्या मागील बाजूस असलेली सावेले गावातील एका शेतकऱ्याची जमीन मुंबईतील गुंतवणूकदाराने सुमारे दहा वर्षांपूर्वी खरेदी केली होती. या जमिनीवर शेती केली जात नव्हती. फार्मला लागून असलेली ही जमीन खरेदी करण्याचा निर्णय अजय देवगण यांनी घेतला. कर्जत तालुक्यातील उद्योजक कडू यांच्या माध्यमातून दोन दिवसांपूर्वी हा व्यवहार पूर्ण झाला. या जमिनीचे सरकारी मूल्यांकन एकरी ३१ लाख रुपये असताना, अजय देवगण यांनी बाजारभावानुसार अधिक रक्कम देत व्यवहार केला. त्यामुळे देवगण फार्मच्या क्षेत्रात आणखी दोन एकरांची भर पडली आहे.

कर्जत येथील प्रशासकीय भवनात अजय देवगण यांच्या वतीने अधिकृत प्रतिनिधीने जमीन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला. या जमिनीची नोंद भोईरवाडी तलाठी कार्यालयात सातबारा नोंदीसाठी आल्यानंतर हा व्यवहार समोर आला असून, अंतिम नोंद कडाव येथील महसूल मंडळ अधिकारी कार्यालयात होणार आहे.

सह्याद्रीला हात लावाल तर नेस्तनाबूत करू!

(पान १ वरुन) विकास झाला पाहिजे, विकासाला समर्थन देणारी आम्ही माणसे आहोत. रोजगार आले पाहिजेत, यासाठी आम्ही पुढे येत असतो. मात्र, एक पेड मां के नाम म्हणता आणि प्रत्यक्षात एक पेड नाही, तर त्यांनी एक पेड नावाखाली आमचे बापाचे आहे म्हणणे. झाडे लावायची नाहीत आणि झाडे तोडायची, हे तुमचे धोरण आहे, अशा शब्दांत विवेकानंद पाटील यांनी सरकारच्या पर्यावरणविषयक भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले.

तुम्ही गुजराती आणणार असाल, तर गुजराती माणूस येथे आम्ही अंगावर घेऊ. महाराष्ट्र नेत्यांनी गुजरातच्या दावणीला बांधला आहे. सगळे प्रकल्प कोणाचे आहेत? गंगेचे पूजन करणारे आपले पंतप्रधान अदानी-अंबानी यांच्या दावणीला बांधले आहेत, असा आरोप त्यांनी केला. फडणवीस मुख्यमंत्री आहेत. तुमच्या राज्यातील मंत्र्यांनी ३३ कोटीची झाडे आम्हाला मोजून दाखवावीत आणि तुम्ही नंतर ९० हजार झाडे दाखवू, असे सांगत वृक्षतोडीच्या आकडेवारीवरही त्यांनी सवाल उपस्थित केला.

आमचा विरोध सह्याद्रीमध्ये प्रकल्प येत असल्यामुळे आहे. यावर्षी पाऊस कमी झाला. सह्याद्रीला धडकणारे ढग एकदा धडकले नाहीत, तर पाऊस पडणार नाही. त्यामुळे सह्याद्रीवर घाव घालणार असाल, तर हा २४ वर्षीय तरुणाचा इशारा समजा. पुन्हा या ठिकाणी झाडे तोडायला आलात, तर आम्ही तुम्हाला नेस्तनाबूत करणार, असा सज्जड इशारा पाटील यांनी दिला.

देशात आणि राज्यात पर्यावरण मंत्री कोण आहेत? त्यांना पर्यावरण काय माहिती? चार कायदे त्यांनी सांगून दाखवावेत, असे आव्हान देत त्यांनी पर्यावरण मंत्र्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केला. शेकरू फक्त सह्याद्रीमध्ये सापडतो. उद्या भीमाशंकर उद्ध्वस्त केला, तर शेकरू नामशेष करण्याचा घाट घातला आहे. आमदार कमी पडत असतील, तर तुम्ही कुठून आणणार? शेकरू कुठून आणणार? खारुताईला शेकरू बनवणार का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

झाडे तोडून ही माणसे गप्प बसणार नाहीत. काळा पाषाण शोधण्यासाठी २०० फूट खोल ड्रिल करणार असाल, तर सह्याद्री खिळखिळा होऊ शकतो. जैवविविधता नष्ट करू नका, असे आवाहन त्यांनी सरकारला केले. झाडे तोडली तर प्रवक्ते फिरायला लागतील, त्यांना कावळे पिंडाला शिवायला मिळणार नाहीत, अशा शब्दांत त्यांनी वृक्षतोडीच्या परिणामांचा इशारा दिला. सरकार प्रचंड धूर्त आहे आणि सरकार चुकत आहे, हे मला पण पटत आहे, असेही ते म्हणाले.

प्रकल्प रद्द करा, फडणवीसांचे कौतुक करू!

फडणवीस यांनी प्रकल्प रद्द करा आणि तुमचे कौतुक करू. मात्र, तुमची मजबुरी आहे. इलेक्ट्रोल बाँड दिल्याने भाजपचा नाईलाज झाला आहे. इतिहासाची पुनरावृत्ती होते. महाराजांचा इतिहास आम्हाला माहिती आहे. पुन्हा इतिहास लिहिला जाईल, असे सूचित करत पाटील यांनी सरकारला इशारा दिला. सरकारचे हस्तक पर्यावरणाची हानी करण्याचे काम करत आहेत. यामुळे आदिवासी लोकांचे जीवनमान संपुष्टात येणार आहे, हेही लक्षात घ्या, असे ते म्हणाले. वन, जंगल, जल आमच्या स्थानिकांचे आहे. आमचे आयुष्य हिरावून घेऊ नका. झाडे खाण्याचा रोग झालेले झाड खाऊ यांना घाबरण्याचे काम नाही. मात्र, शेतकऱ्यांनी आत्महत्या करू नका, असे आवाहनही त्यांनी केले.

झाडखाऊंसाठी दलाली करणारे भाडखाऊ

- सयाजी शिंदेंचा टोरंटविरोधात संतापाचा उद्रेक
- झाडांच्या शोकसभेला न आलेल्यांचा घेतला समाचार







| नेरळ/कर्जत | प्रतिनिधी |

टोरंटसाठी झाडे कापणारे झाडखाऊ आहेत, तर त्यासाठी दलाली करणारे भाडखाऊ आहेत, असा जाहीर आरोप अभिनेते व पर्यावरणप्रेमी सयाजी शिंदे यांनी केला. ३२ हजार नव्हे, तर ३२ लाख झाडे तोडणार आहेत, असा गंभीर दावा करत झाडे तोडण्याची परवानगीच द्यायची नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. कर्जतच्या लोकमान्य टिळक चौकात शनिवारी (दि.७) झालेल्या 'सेव्ह सह्याद्री'च्या सभेत शिंदे यांनी टोरंट प्रकल्पाविरोधात आक्रमक भूमिका मांडत उपस्थितांना झाडे वाचविण्यासाठी एकजूट होण्याचे आवाहन केले.

'सेव्ह सह्याद्री'च्या निमित्ताने कर्जत येथे पर्यावरणप्रेमी आणि अभिनेते सयाजी शिंदे तसेच विद्यार्थी नेते विवेकानंद पाटील यांची जाहीर सभा लोकमान्य टिळक चौकात आयोजित करण्यात आली होती. या सभेत बोलताना त्यांनी, मला माझ्या आईने झाडाचे महत्त्व सांगितले आहे. झाड हेच आपले जीवन आहे आणि त्यामुळे कोणालाही झाड तोडून देणार नाही, असा ठाम इशारा दिला. झाडे तोडली जात असताना त्यावर अवलंबून असलेल्या पक्ष्यांच्या जीवनाचे काय होणार, याचा विचार कोण करणार? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. कापलेल्या झाडांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी आणि त्यांच्या शोकसभेला नेत्यांनी यायला हवे होते. मात्र, त्यांना त्यासाठी वेळ मिळाला नाही, अशी टीका त्यांनी केली. तसेच, रोज झाडे तोडण्याचा बाजार भरला आहे. झाडखाऊंची दलाली करणाऱ्या भाडखाऊंना हाकला. दलाल लोकांना जवळ उभे करू नका. पैसा हा भयानक रोग आहे. डोंगर चढत असताना ऑक्सिजन मिळाला नाही तर जगणार कसे, असा सवाल करत पैसे घेऊन चूक करू नका, असे आवाहनही सयाजी शिंदे यांनी केले.

यावेळी पर्यावरणप्रेमी विजयसिंह पाटील, शरद शेलार, अभिजित खरात, कर्जत बचाव समितीचे समन्वयक ॲड. कैलास मोरे, कर्जतच्या नगराध्यक्ष पुष्पा दगडे, शिवसेना ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, उपनगराध्यक्ष संतोष पाटील, मनसेचे माजी जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील, माजी नगराध्यक्ष राजेश लाड, वंचितचे जिल्हा महामंत्री धर्मेंद्र मोरे, आरपीआयचे कोकण संघटक राहुल डाळींबकर, शिवसेना ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख बाजीराव दळवी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष शंकर भुसारी, राष्ट्रीय काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संजय गवळी यांच्यासह पर्यावरण बचाव समितीला पाठिंबा देणाऱ्या सामाजिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

या सभेच्या प्रास्ताविकात कर्जत बचाव समितीचे प्रवीण गांगल यांनी कर्जत तालुक्यात येत असलेल्या प्रकल्पांची माहिती दिली. तर, ॲड. कैलास मोरे यांनी टोरंट प्रकल्पाला विरोध का, असा प्रश्न उपस्थित केला. शासन हा प्रकल्प पर्यावरणपूरक असल्याचे सांगते, मग शासनाची भूमिका स्पष्ट का नाही? हा प्रकल्प आणण्याचा घाट कशासाठी, असा सवाल त्यांनी केला. पाणी किती अडवणार? आमचे तोंडाचे पाणी पळवणार आहेत. त्यामुळे शहरी आणि ग्रामीण भागातील पाण्याचा प्रश्न नव्याने उभा राहणार आहे. कर्जतमध्ये तीन लाख लोक राहतात, पण आम्हाला पाणी कोण देणार? झाडे तोडली तर ऑक्सिजन कुठून आणणार? असे प्रश्न उपस्थित करत कर्जत वाचविण्याचे आवाहन त्यांनी केले.

मरेपर्यंत झाडे तोडू देणार नाही!

आईनंतर श्रेष्ठ झाड आहे, हे समजून देवराई फुलवत आहे. झाडाने आपल्याला जगवले. झाड आपल्याला ऑक्सिजन देते. झाडे वाचली तरच आपण जगणार आहोत. ते नेतेमंडळी पण जगतील, हे त्यांना कधी समजेल? मी मरेपर्यंत सोडणार नाही आणि झाडे तोडू देणार नाही. येथे तुम्ही एकत्र राहा. त्यावेळी मी एक लाख लोक येथे आणतो आणि हे प्रकल्प येथून हटवू, असे जाहीर आव्हान सयाजी शिंदे यांनी दिले.

सह्याद्रीचे अंत्यदर्शन करून जा!

सह्याद्रीतील तुटलेली झाडे शेवटची झाडे आहेत. तेथे तुटलेली झाडे, त्यांचे अंत्यदर्शन करायला येऊन जा. नाहीतर सह्याद्री बघायला मिळणार नाही; पण भूतकाळात सह्याद्री होता, हे दिसून येईल, अशा शब्दांत त्यांनी पर्यावरणाच्या ऱ्हासाचे गांभीर्य मांडले. राज्यभरातून माणसे आलेली आहेत. यापुढे टोरंट उद्ध्वस्त करायला आणि हाकलून लावायला तुमची गरज लागणार आहे, असेही ते म्हणाले.

भाडखाऊ दलालांना हाकला!

रोज झाडे तोडण्याचा बाजार भरला आहे. झाडखाऊंची दलाली करणाऱ्या भाडखाऊंना हाकला. दलाल लोकांना जवळ उभे करू नका. पैसा हा भयानक रोग आहे. डोंगर चढत असताना ऑक्सिजन मिळाला नाही तर जगणार कसे, असा सवाल करत पैसे घेऊन चूक करू नका, असे आवाहन त्यांनी केले.

३२ हजार नाही, तर ३२ लाख झाडे तोडणार!

३२ हजार झाडे दाखवून तोडण्याची परवानगी द्यायची आणि प्रत्यक्षात तेथे ३२ लाख झाडे तोडणार आहेत, हे मनात नक्की समजा. वन विभाग बेजबाबदार आहे. १०० फूट उंचीची झाडे तोडली आहेत. वन विभाग कुठे झाडे लावतो, तेथे गवतदेखील मोजणार, असे सांगत त्यांनी वन विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

पेज नदी वाचवणार!

रक्तवाहिन्या आटवण्याचे काम सुरू आहे. पेज नदी वाचवायची आहे. झाडे वाचवली तर पेज नदीही वाचेल आणि सर्व काही वाचेल, असे ठाम प्रतिपादन सयाजी शिंदे यांनी केले.

निवडक



रायगड मित्र दिवाळी अंकाचे प्रकाशन

भाकरवड : अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथील रायगड भूषण पत्रकार दिपक पाटील संपादीत 'रायगड मित्र' या सतराव्या दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या हस्ते आणि शेकाप महाराष्ट्र राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी (दि.८) अलिबाग येथे करण्यात आले. या प्रकाशन सोहळ्याला वाघ्रण सरपंच राजेंद्र पाटील, माजी सरपंच उदय पाटील, पेढांबे उपसरपंच रुपेश पाटील, सदस्य अनिल पाटील, रुबीना कुरेसी, कर्मचारी अजित पाटील, तंटामुक्त अध्यक्ष गिरीश पाटील, तुकाराम पाटील, प्रमोद पाटील, विवेक पाटील, संजय पाटील, जीवन पाटील, गौतम पाटील, संजय पाटील, मुख्याध्यापक संघटनेचे पदाधिकारी श्रीकांत पाटील, राजेश तांबोळी, मनोहर पाटील, मकरंद पाटील, प्रज्वल पाटील आणि प्रकाशक क्षितिज पाटील आदी उपस्थित होते.



कॉनकोर कंपनीतील आंदोलन स्थगित

उरण : उरण तालुक्यातील मे. सॅम सर्वेअर्स ऍण्ड ऍडजेस्टर्स या कंत्राटदारामार्फत डी.आर.टी.ए सी.एफ.एस कॉनकोर-द्रोणागिरी येथे कार्यरत असलेल्या १११ कामगारांचे मागील चार महिन्यांचे बेकायदेशीर वेतन कपात केल्याबद्दल, तसेच इतर विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी पूर्ण सी.एफ.एसचे काम कर्मचाऱ्यांनी बंद केले होते. सतत होत असलेल्या अन्यायाच्या निषेधार्थ व मागण्यांच्या पूर्ततेसाठी रायगड श्रमिक संघटनेच्या माध्यमातून आणि कामगार नेते भूषण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कामगारांनी कंपनीच्या गेट समोरच आंदोलन सुरु केले होते. मात्र, आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी कामगारांचे मागण्या मान्य झाल्याने कामगार वर्गांनी एकच जल्लोष साजरा करत आनंद व्यक्त केला.

लक्ष्मीमातेची आकर्षक रांगोळी



खांदेश्वर : पनवेलमध्ये दीपावलीच्या पहिल्या दिवशी लक्ष्मीपूजनाचा शुभमुहूर्त साधत रविवारी (दि.८) शहरातील रांगोळी कलाकारांनी लक्ष्मीमातेची आकर्षक रांगोळी साकारली. विविध रंगांच्या छटांमधून साकारलेल्या लक्ष्मीमातेच्या रूपाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. रांगोळीतील कलात्मकता आणि सुबक मांडणीमुळे परिसरात दीपावलीचे मंगलमय वातावरण निर्माण झाले. लक्ष्मीच्या आगमनाचे प्रतीक असलेल्या या रांगोळीने सणाचा आनंद द्विगुणित केला.

ढवर येथे रस्त्याच्या कामाचा शुभारंभ

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील ढवर येथे शेकाप राज्य प्रवक्त्या तथा नेत्या चित्रलेखा पाटील यांच्या विशेष प्रयत्नांतून आणि ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे डांबरी रस्त्याच्या कामाचा शुभारंभ रविवारी (दि.८) चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने हे महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

मतदारसंघातील ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधताना रस्ते, पाणीपुरवठा, वीज, अंतर्गतरस्ते तसेच सार्वजनिक सुविधांसारख्या मूलभूत विकासकामांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न चित्रलेखा पाटील यांच्याकडून सातत्याने केला जात आहे. ग्रामीण भागातील रस्ते हे विकासाचे महत्त्वाचे माध्यम आहे. त्यामुळे याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून ढवर गावातील मुख्य डांबरी रस्त्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी ग्रामस्थांनी, ढवर गावातील आजवर झालेली अनेक विकासकामे शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातूनच मार्गी लागली असल्याची भावना व्यक्त केली. ग्रामस्थांच्या अपेक्षा, लोकसहभाग आणि विकासाचा ध्यास यांची सांगड घालत ढवर गावाच्या विकासाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल पडले असून, आगामी काळातही मतदारसंघातील विविध प्रलंबित विकासकामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचा निर्धार यावेळी चित्रलेखा पाटील यांच्या मार्फत व्यक्त करण्यात आला.



कर्जतमध्ये व्यंगचित्र प्रदर्शन

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत येथील व्यंग चित्रकार विशाल सुरावकर यांच्या व्यंगचित्रांचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. या प्रदर्शनात विविध मासिक आणि दिवाळी अंकांमध्ये तसेच दैनिक वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली १५० व्यंगचित्र मांडण्यात आली आहेत. हे प्रदर्शन कर्जत येथील छत्रपती शिवाजी मंडळाने भरवले असून, या प्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार विजय मांडे, अभिनेते निर्माते दिग्दर्शक प्रदीप गोगटे आणि संगीतकार व गायक गौतम वैद्य यांच्या हस्ते पार पडले. यावेळी श्री छत्रपती शिवाजी महाराज मंडळाचे अध्यक्ष गजानन गुरव, ज्येष्ठ मार्गदर्शक म्हसे, प्रसिद्ध व्यंगचित्रकार विशाल सुरावकर, संस्थेचे अध्यक्ष विकास चित्ते, उपाध्यक्ष सुधांशू वनगे, सचिव शैलेश सातपुते, उपखजिनदार महेंद्र कर्वे, सदस्य अमित गुरव, अमेय कुलकर्णी, नेहा सातपुते, वैष्णवी गुप्ता व गौरव चित्ते उपस्थित होते. विशाल सुरावकर यांनी आपल्या व्यंगचित्रात अनेक विषयास हात घातला आहे.



पोलिसांसोबत दिवाळी साजरी

| पनवेल | प्रतिनिधी |

नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसोबत शेतकरी कामगार पक्षाचे कामोठे शहर कार्याध्यक्ष गौरव पोरवाल यांनी दिवाळीचा आनंद साजरा केला. यानिमित्त कामोठे पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना श्रीमद्भागवद्गीतेची प्रत आणि मिठाई भेट देऊन दीपावलीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी कामोठे पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी ज्योती देशमुख, गुन्हे शाखेचे प्रभारी पगार यांच्यासह पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. ऊन, पाऊस आणि सणासुदीची पर्वा न करता नागरिकांच्या सुरक्षेसाठी सतत कार्यरत असलेल्या पोलीस बांधवांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी कार्यकर्त्यांना नेहमीच जनतेची सेवा करणाऱ्या प्रत्येक घटकाचा सन्मान करण्याची शिकवण दिली आहे. याच विचारांचा वारसा पुढे नेत गौरव पोरवाल यांनी पोलीस बांधवांसोबत दिवाळी साजरी करत सामाजिक बांधिलकी जपली. या उपक्रमातून कर्तव्यदक्ष पोलीस यंत्रणेप्रति आदर आणि कृतज्ञतेचा संदेश देण्यात आला.

कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

| पनवेल | प्रतिनिधी |

- हक्काच्या आरोग्य सुविधांपासून वंचित
- स्वतंत्र रुग्णालय उभारण्याची मागणी

रायगड जिल्ह्यातील तळोजा, पाताळगंगा, नागोठणे, रोहा आणि उरण या औद्योगिक क्षेत्रांतील लाखो कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना दर्जेदार वैद्यकीय सुविधा मिळाव्यात, यासाठी पनवेल येथे कर्मचारी राज्य विमा योजना रुग्णालय उभारण्याची मागणी महाराष्ट्र राज्य कामगार युनियनचे विनायक गांधी यांनी केली आहे. यासंदर्भात राज्याचे कामगार मंत्री, कर्मचारी राज्य विमा महामंडळाचे महासंचालक तसेच रायगड जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.

जिल्ह्यातील विविध औद्योगिक वसाहतींमध्ये हजारो कारखाने कार्यरत असून, लाखो कामगार आणि सुरक्षा रक्षक आपले कर्तव्य बजावत आहेत. या कामगारांच्या वेतनातून दरमहा कर्मचारी राज्य विमा योजनेची वर्गणी नियमितपणे कपात केली जाते. मात्र, त्याबदल्यात मिळणाऱ्या वैद्यकीय सुविधा अपुऱ्या असल्याने कामगारांना उपचारांसाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पनवेलमधील सध्याचे कर्मचारी राज्य विमा कार्यालय आणि आरोग्य केंद्र दोन मजली इमारतीत असून, तेथे उद्वाहकाची सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे वृद्ध, गंभीर आजारी तसेच चालण्यास असमर्थ असलेल्या रुग्णांना वरच्या मजल्यावर जाण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागतो. रुग्णांच्या सोयीसाठी सर्व वैद्यकीय सुविधा तळमजल्यावर उपलब्ध करून द्याव्यात किंवा इमारतीत तातडीने उद्वाहकाची व्यवस्था करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. याशिवाय, अनेक वर्षांपासून हे आरोग्य केंद्र भाडेतत्त्वावरील इमारतीत सुरू असल्याने शासनाचा मोठा निधी भाड्यापोटी खर्च होत आहे. स्वतंत्र रुग्णालयासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हा प्रशासनाकडून ठोस कार्यवाही होत नसल्याची नाराजी निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, कामगारांच्या वेतनातून नियमितपणे विमा वर्गणी कपात होत असताना त्यांना त्यांच्या हक्काच्या आरोग्य सुविधांपासून वंचित राहावे लागणे अन्यायकारक आहे. त्यामुळे पनवेलमध्ये स्वतंत्र रुग्णालय उभारण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी विनायक गांधी यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

श्री छत्रपती शिवाजी मंडळाचा स्तुत्य उपक्रम | **एका छताखाली साहस, इतिहास, कलेचा संगम**

कर्जतमध्ये किल्ले रायगड फोटो प्रदर्शन

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत येथील श्री छत्रपती शिवाजी मंडळाच्यावतीने शिवशंभो युवा हायकर्स यांच्या कार्याची माहिती देणारे तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ले रायगडाची माहिती देणारे चित्र प्रदर्शन भरवले आहे. हे प्रदर्शन पाहण्यासाठी विद्यार्थ्यांची मोठी गर्दी होत आहे.

कर्जत येथील पाटील आळीमधील हनुमाना मंदिराच्या सभागृहात छत्रपती शिवाजी मंडळाच्यावतीने चित्र प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन पत्रकार संतोष पेरणे, विजय मांडे, अभिनेते निर्माते दिग्दर्शक प्रदीप गोगटे आणि संगीतकार व गायक गौतम वैद्य यांच्या हस्ते पार पडला. यावेळी श्री छत्रपती शिवाजी महाराज मंडळ कर्जतचे अध्यक्ष गजानन गुरव, ज्येष्ठ मार्गदर्शक म्हसे, प्रसिद्ध व्यंगचित्रकार विशाल सुरावकर, संस्थेचे अध्यक्ष विकास चित्ते, उपाध्यक्ष सुधांशू वनगे, सचिव शैलेश सातपुते, उपखजिनदार महेंद्र कर्वे, ज्येष्ठ सदस्य अमित गुरव, सदस्य अमेय कुलकर्णी, नेहा सातपुते, वैष्णवी गुप्ता आणि गौरव चित्ते उपस्थित होते.



हनुमान मंदिराच्या दुसऱ्यामजल्यावरील दालनामध्ये शिवशंभो युवा हायकर्सतर्फे किल्ले रायगडच्या विविध भागांचे तपशीलवार फोटो प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनात रायगड किल्ल्याचा विविध अंगी अभ्यास करता येणार आहे. किल्ले रायगड फोटो प्रदर्शनासोबतच शिवशंभो युवा हायकर्स संस्थेने लहान मुले व तरुणांमध्ये साहस, जिद्द, पराक्रम आणि छत्रपतींविषयी प्रेम निर्माण व्हावे म्हणून अनेक उपक्रमांचे आयोजन केले आहे. त्याचेही फोटो या प्रदर्शनात पाहायला मिळत आहेत. त्याचसोबत रायगड किल्ल्यावर सापडलेले काही ऐतिहासिक नमुने तसेच गिर्यारोहण साहित्य हे सुद्धा या प्रदर्शनाच्या आकर्षणाचा महत्त्वाचा भाग आहे. अशाप्रकारे एका छताखाली साहस, इतिहास आणि कला याचा सुरेख संगम कर्जतकर रसिकांना अनुभवायला मिळत असून, या प्रदर्शनास कर्जतकर रसिकांचा भरभरून प्रतिसाद मिळत आहे.

फिटो अंधाराचे जाळे

दिवाळी सुरू झाली आहे. आसमंतात दिवे, फटाके, फराळ यांचा उत्साह भरून राहिलेला आहे. यंदा महाराष्ट्रासह काही राज्यांमध्ये दुष्काळाचे सावट आहे. अगदी कोकणातही शिमग्यानंतरच्या पाणीटंचाईची चित्रे अनेक गावात दिसू लागली आहेत. तरीही दु:खांना आणि चिंतांना मागे ठेवून सण साजरे करणे ही मानवी प्रवृत्ती आहे. त्यानुसार दिवाळीच्या खरेदीत आणि आनंदात लोकांनी कसूर सोडलेली नाही. निदान शहरांमधील वाहून चाललेली दुकाने तरी हेच सांगतात. त्या झगमगटापासून दूर अगदी शहरातल्या शहरातही वेगळे चित्र दिसेल. पण दुकानांमधील गर्दीचे चित्र हेही खोटे नाही. गणपती, दसरा, दिवाळी या ओळीने येणाऱ्या तीनही सणांना ओसंडून वाहणाऱ्या बाजारपेठा दिसतात. त्यात सहभागी होणारे लोक हेही संख्येने कमी नाहीत. दुसरीकडे मराठवाडा किंवा इतर भागातल्या तालुक्याच्या गावांमध्ये काहीसा शुकशुकाट दिसतो. बाजारात उत्साह नसल्याच्या बातम्या येतात. हेही चित्र खरेच आहे. किंबहुना, आजच्या भारताचे आणि अर्थातच महाराष्ट्राचे हेच मोठे वैशिष्ट्य झाले आहे. हा जबरदस्त दुभंग तयार झाला आहे. दोन वेगवेगळे समाज एकाशेजारी एक राहत असल्याचे दिसते. गरीब आणि श्रीमंत, संपन्न आणि अभावग्रस्त, दुष्काळ आणि सुकाळ अशी विभागणी पूर्वापार होती. पण तेव्हा श्रीमंत, संपन्न आणि सुकाळाच्या विभागातल्यांची संख्या अल्प होती. महत्वाचे म्हणजे आपली संख्या अल्प आहे याची त्यांना कल्पना होती. एका मोठा वर्ग अभावात जगत आहे याची त्यांना थोडीफार कल्पना होती. या गरिबीला आपणच जबाबदार आहोत असा अपराधभाव जागृत होता. आज हा अपराधभाव संपला आहे. दिवाळी किंवा अशाच सणांना बाजारपेठांमध्ये प्रचंड खरेदी करणारा वर्ग स्वत:मध्ये बुडून गेला आहे. आपली संपत्ती आपण कष्टाने मिळवली आहे आणि कोणीही कष्ट केले तर त्यालाही अशीच सुबत्ता आणि सर्व सुखे मिळू शकतील असा एक ठाम समज तयार होऊन गेला आहे. पलिकडच्या चित्राकडे किंवा तिथल्या हालअपेष्टांकडे पाहायला कोणालाही फुरसत राहिलेली नाही. त्याहूनही महत्वाचे म्हणजे तशी गरजही वाटेनाशी झालेली आहे.

मुख्यमंत्र्यांची दिवाळी

आयटीमध्ये काम करणारे तरुण- तरुणी सकाळी आठपासून रात्री नऊ वाजेपर्यंत अथक काम करतात हे खरेच आहे. पण गावातल्या बायका निव्वळ पाणी आणण्यासाठी दिवसभरात याच्या दुप्पट कष्ट करतात. यातल्या पहिल्या कष्टांना महिना एक लाख रुपयांचे फळ येते. तर दुसऱ्या कष्टांचे मोल शून्य असते. पूर्वी या फरकाची जाणीव समाजात जागी होती. आता ती संपत चालली आहे. दिवाळी हा प्रकाशाचा सण आहे असे आपण म्हणतो. अंधार दूर होवो, प्रकाशाने सर्व दिशा उजळून निघोत अशा शुभेच्छा आपण एकमेकांना देतो. नव्या काळात, समाजातील अभावाबद्दलच्या या जाणिवेचा प्रकाश पडो व पसरो अशा शुभेच्छा देण्याची आता वेळ आली आहे. आणि हा प्रकाश कृत्रिम नसो. खरा असो. दिवाळीच्या आदल्या रात्री आपले मुख्यमंत्री नागपूरला एका शेतकऱ्यांच्या कुटुंबात जाऊन राहिले. शेतकऱ्यांवर दुष्काळ, नापिकी, पाणीटंचाई यामुळे जबरदस्त आघात केला आहे. आपण म्हणजे सरकार त्यांच्यासोबत आहोत हे दाखवण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी ही कृती केली असावी. पण या शेतकरी कुटुंबातील महिलांची मुलाखत आधी टीव्हीवर दाखवली जात होती. त्यात फडणवीसांसाठी आपण किती प्रकारचे पदार्थ केले आहेत हे त्या सांगत होत्या. फडणवीस म्हणजे आपले भाऊ आहेत, ते घरी आल्यावर आमची दु:खे त्यांना कशाला सांगायची असे त्या म्हणत होत्या. महात्मा गांधी दलितांच्या किंवा सफाई कामगारांच्या वस्तीत जाऊन राहत. त्यांच्यासारखी कष्टाची कामे करत. विनोबा रोज शेतात किंवा बागेत घाम निघेल इतके काम केल्याखेरीज अन्नपाणी घेत नसत. मुख्यमंत्र्यांनी यापैकी काहीही केले नाही. शिवाय ते शेतकऱ्याच्या कुटुंबात गेले म्हणजे एखाद्या अभावग्रस्ताच्या घरी राहिले असे झाले नाही. त्यामुळे हा केवळ स्थानबदल झाला. आपल्या घरी राहिले असते त्याऐवजी गावातल्या एका सुस्थित घरात जाऊन ते राहिले इतकेच. लोकांच्या दु:खाशी समरस होण्याचा फडणवीसांचा प्रयत्न ठीक आहे. पण त्यामागचा हेतू सरळ नाही. त्यात भाजपच्या प्रचारी आणि व्यापारी वृत्तीचे अधिक प्रत्यंतर पडलेले दिसते. दिवाळीच्या निमित्ताने थोडा करुणेचा प्रकाश पाडून त्यात राजकीय हित साधण्याचा हेतू यात अधिक दिसतो. तो नसता तर बरे झाले असते.

अमेरिकेने दाखवली वाट

अंधार केवळ भारतातच नाही. अमेरिकेपासून सर्वत्र आहे. तिथे बर्नी सँडर्स हे समाजवादी विचारांचे ज्येष्ठ नेते आहेत. अमेरिकेत समाजवादी किंवा कम्युनिस्ट हे शब्द शिवीसारखे दिले जातात. अशा अमेरिकेत आज कोट्यवधी लोक सँडर्स यांच्याभोवती गोळा झाले आहेत. अमेरिकेत अशक्य वाटाव्या अशा गोष्टी ते बोलतात. ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला परवाच्या निवडणुकीत हरवण्यात त्यांच्या भाषणांचा वाटा होता. देशातील वरच्या केवळ एक टक्के लोकांकडे ३ टक्के संपत्ती आहे हे ते नेहमी सांगतात. देशातील पन्नास टक्के लोकांच्या उत्पन्नाइतकी संपत्ती एकट्या एलॉन मस्ककडे आहे हे ते दाखवून देतात. यावर उपाय म्हणून पाच टक्के संपत्तीकर लागू करावा व त्यातून देशातील सर्व लोकांना मोफत शिक्षण व आरोग्याच्या सोयी द्याव्यात असे त्यांचे म्हणणे आहे. अमेरिकेत असे म्हणणे मांडणे व लोकप्रिय करणे हा अंधार दूर करून प्रकाश पसरवण्याचा प्रयत्न होता. तो काही प्रमाणात यशस्वी होताना दिसतो आहे. भारतातही असे प्रयत्न व्हायला हवेत. दुर्दैवाने इथे धर्माच्या बडिवाराचे एक जबरदस्त धुके पसरलेले आहे. या देशात ८० टक्के लोक हिंदू आहेत. तरीही इथे हिंदूंवर अन्याय होतो असा प्रचार सध्या लोकप्रिय आहे. भल्याभल्या लोकांना हे म्हणणे पटते. हिंदू असे नाव घेऊन कोणी काहीही बोलावे व करावे असा प्रकार सुरू आहे. हिंदूंचे सण आले की मुस्लिम व्यापाऱ्यांकडून वस्तू घेऊ नका अशी आवाहने नितेश राणे यांच्यासारखे भाजपचे नेते करतात. समाजात फूट पाडणारी ही भाषा आहे. शिवाय खरी गरीबी, दुष्काळ यांच्यावरून लक्ष बाजूला वळवणारे हे प्रकार आहेत. पण दुर्दैवाने या वक्तव्यांना सध्या अमाप प्रसिध्दी मिळते. अंधार वाढत जातो. दिवाळीच्या निमित्ताने खरे तर ही काळोखी दूर व्हायला हवी आहे. अमेरिकी समाजाने रस्ता दाखवला आहे. तिथे ट्रम्प, मस्क इत्यादींचा माज लोकांनी उतरवला आहे. असे घडू शकते असे एक वर्षांपूर्वी कोणाला खरे वाटले नसते. पण ते झाले. त्याने एक आशा निर्माण केली. आपल्याकडेही काही महिन्यांपासून हे घडू लागले आहे. कॉकरोच जनता पार्टी नावाच्या तीन महिन्यांच्या संघटनेने एका केंद्रीय मंत्र्याला घरी घालवले आहे. मोदींच्या विरोधात सर्व विरोधी पक्षांचा विराट मोर्चा नुकताच दिल्लीत निघाला. असंतोष असलेल्यांना आपण अल्पमतात नाही याची जाणीव झाली आहे. दिवाळीच्या निमित्ताने हा अंधार असाच फिटो. दरम्यान सण साजरा करताना आपल्याला दुष्काळग्रस्त बांधवांची आठवण असो. त्यांना हातून काही मदत घडो. कृषीवल परिवारातर्फे सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा.

विचार

संत तुकोबांची दिवाळी....

दसरा दिवाळी तोचि आम्हां सन ।।
सखे संतजन भेटतील ।।१।।
आमुप जोडल्या पुण्याचिया राशी ।।
पार त्या सुखासी नाहि लेखा ।।२।।
धन्य दिवस आजी झाला सोनियाचा ।।
पिकली हे वाचा रामनामें ।।३।।
तुका म्हणे काय होऊं उतराई ।।
जीव ठेवू पांयीं संतांचिये ।।४।।

– संत तुकाराम महाराज

सखे संत जेंव्हा भेटतात तोच आमचा दसरा-दिवाळीचा सण ! आम्ही अमाप पुण्याच्या राशी कमावलं आहे त्यामुळे आमच्या सुखाला आता पारावर राहिला नाही. आजचा दिवस सोन्याचा झाला आहे त्यामुळे आम्ही धन्य झालो. राम (नामाने) वाचा परिपक्व झाली.

संत तुकाराम महाराज म्हणतात, ''मी तुमचा कसा उतराई होऊ, मी माझे प्राण तुमच्या चरणीं अर्पण करत आहे.

दिवाळी-दसरा म्हटलं म्हणजे आनंदी आनंद! सुगी झालेली असते. पाऊस थांबलेला असतो. रानात भरपूर चारा झालेला असतो. त्यामुळे जनावरं खाऊन पिऊन धष्टपुष्ट झालेली असतात. धान्यांच्या राशी घरात येऊन पडलेल्या असतात. त्यामुळे कुणबीही आनंदी असतो. बळीराजा सुखी तर जग सुखी ! त्यामुळे शेतमजूर अलुतेदार, बलुतेदारही खुष असतात. सर्व भूमी, डोंगरदऱ्या हिरव्या शालूने नटलेले असतात. ओढे-नाले भरुन वहात असतात. तळी भरलेली असतात. सर्व सृष्टी आनंदाने न्हाऊन निघालेली असते. दसरा सण मोठा । नाही आनंदा तोटा ।। आणि दिवाळीचं महत्त्व तर आगळंच ! दिवाळी म्हटली की घरं आवरणार, नवा रंग देणार. भांडीकुंडी, डबेबाटल्या, आंथरुण-पांघरुण सर्व धुवून, पुसून लखलखीत कळणार! सासरी गेलेल्या लेकीबाळी माहेरी येणार !

कष्टकऱ्यांच्या जीवनात गोडधोड, साग्रसंगीत स्वयंपाकालाही निमित्त दिवाळीचंच !

दिवाळीचा फराळ म्हणजे बालगोपालांना मेजवानीच ! सासरी गेलेल्या लेकीला माहेरच्या मूळ कधी येणार याची आस लागते. धुणंभांडी, स्वयंपाकपाणी सगळं करत असताना तिची नजर परत परत रस्त्याकडे जात असते. तिला माहेरची ओढ लागलेली असते. तिचं बालपण, बालपणाच्या मैत्रिणी, तिचं घर, अंगण, गाव सारं तिच्या नजरेपुढे फेर धरुन नाचत असतात. मन आठवणींच्या हिंदोळ्यावर सतत डोलत असतं. त्या आठवणींनी तिच्या जीवाला हुरहुर लागलेली असते! सासुरवाशीणीच्या त्या मन:स्थितीचं दर्शन तुकाराम महाराज त्यांच्या एका अभंगातून फार मार्मिक शब्दात करतात.

''दिवाळीच्या मुळा लेकी आसावली । पाहतसे वाटुली पांडुरंगे ।।''. अशी ही दिवाळी साऱ्या सर्व नात्यांना उजाळा देते. आनंद देते. वर्षभराचं सर्व कष्ट, दु:ख पचवायची ताकद देते. जगण्याची ऊर्जा देते. तुकाराम महाराजांना हा आनंद, हा उत्साह, ही ऊर्जा संतांच्या भेटीतून मिळते. म्हणून जगद्गुरू तुकाराम महाराज म्हणतात,

''दसरा दिवाळी तोचि आम्हां सण ।
सखे संतजन भेटतील ।।

जगतगुरु तुकाराम महाराजांनी हाच इतर अनेक अभंगांतूनही व्यक्त केला आहे. त्यातून तुकाराम महाराजांना संतांबद्दल असलेला अतिव आदर, जिव्हाळा, आपुलकी, आत्मियता, ओढ वारंवार व्यक्त झाली आहे. संतांना तुकाराम महाराज सखे म्हणजे जिवलग मित्र संबोधतात, मायबाप म्हणतात. सगेसोयरे म्हणतात. देव म्हणतात. त्यांच्या पायी लोटांगण घालतात. त्यांचं दास्यत्व स्विकारण्याची भाषा करतात. त्यांचं उष्टे अन्न भक्षण करुन त्यांच्या पायी राहण्याची इच्छा व्यक्त करतात. तुकाराम महाराजांचे हे सगेसोयरे म्हणजे संत नामदेव महाराज, संत ज्ञानदेव महाराज, संत जनाई, संत चोखोबा, संत सोयराई, संत कबीर, संत सजन कसाई, संत दादू पिंजारी, संत नरहरी सोनार, संत सेना, संत सावता अशी सारी संतांची मांदियाळी म्हणजे तुकाराम महाराजांचे सगेसोयरे आहेत. त्यांच्या सहवासाची तुकाराम महाराजांना आस आहे. ओढ आहे. त्यांच्या सहवासाने तुकाराम महाराजांना अतिव आनंद होतो. त्यांच्या सहवासात तुकाराम महाराजांच्या चित्तवृत्ती फुलून येतात. म्हणून ही सर्व मंडळी जेंव्हा घरी येतात तेंव्हा तो दिवस म्हणजे तुकाराम महाराजांना दसरा-दिवाळी इतका आनंदाचा आणि महत्त्वाचा सण वाटतो. तेराव्या शतकातले संत नामदेव, संत ज्ञानदेव, संत जनाई वगैरे सतराव्या शतकातल्या तुकाराम महाराजांच्या घरी कसे येणार ? असा प्रश्न एखाद्याला पडू शकतो.

कितीही महान व्यक्ती असली तरी तिचं शरीर मर्त्यच असतं. पण शरीर जरी मर्त्य असलं तरी त्यांचा विचार अमर असतो. आज ही सर्व संत मंडळी त्यांच्या साहित्यातून आपल्याशी बोलतात. संवाद साधतात. आपल्याशी हितगूज करतात.

दिशा दाखवतात. मार्गदर्शन करतात. त्यांच्या आयुष्यातल्या सुखदु:खाच्या गोष्टी सांगतात. त्यांच्या आयुष्यातले संघर्ष, त्यांनी दिलेले लढे, सोसलेले आघात, त्या काळचा समाज, लोकांची स्थिती, लोकरुढी, लोकजीवन अशा सर्वांबद्दल संत आपल्याशी बोलतात. इतिहास सांगतात. भविष्याकडे निर्देश करतात. वर्तमानात जगताना कसं जगावं ते शिकवतात. आपले सखेसोबती, मायबाप आपल्यासाठी जे जे करतात ते सर्व संत आपल्यासाठी करतात. म्हणून त्यांचं घरी येणं हाच खरा दिवाळी-दसरा आनंदीआनंद सण आहे असं संत जगतगुरू तुकाराम महाराजांना वाटतं.

पारंपारिक दिवाळीपेक्षा ही दिवाळी तुकाराम महाराजांना महत्त्वाची वाटते.

दिवाळी म्हटली की दिवाळीपाडवा आलाच. यालाच बळीप्रतिपदा असंही म्हणतात. या दिवशी ब्राह्मणांच्या घरी शेणाचा बळी करुन त्याची दर्भाच्या काडीने हत्या केली जाते. तर बहुजन समाज बळीच्या प्रतिमेचं पूजन करुन, बळीराजाचा जयजयकार करतो.

बहुजन स्त्रीया ''इडा-पिडा टळो आणि माझ्या बळीराजाचे राज्य येवो'' अशी इच्छा व्यक्त करतात.

हा बळीराजा कोण ?

त्याच्याबद्दल हजारो वर्षांनंतरही बहुजनांच्या मनात इतका आदर आणि प्रेम का ?

शेतकऱ्यांना आजही बळीराजा का म्हटलं जातं ? पोथ्या-पुराणातून ज्या बळीला वामनाने तीन पावलात पाताळात घातलं म्हणून सांगितलं आहे. याच पोथ्यापुराणातून बळीराजाचं कर्तृत्व, दातृत्व, प्रजाहितदक्षता यांचं कौतुकही केलं आहे. बळीच्या राज्यात पाऊस वेळेवर पडत होता. धनधान्याने शेती फुललेली असायची. बळीराजाची सर्व प्रजा सुखी होती.

भाई आकाश निर्मळ

बळीराजाच्या जाण्याने सर्व सामान्य प्रजेला अतिशय दु:ख झालं. प्रजेने विलाप केला. बळीराजा हा चिरंजीव आहे असं समजलं जातं. आणि दरवर्षी तो आपल्या प्राणप्रिय प्रजेला भेटण्यासाठी पाताळातून पृथ्वीवर येतो आसं सांगतात. आपली प्रजा दु:खी असलेली दिसली तर त्याला अतिव दु:ख होईल. आपल्या प्राणप्रिय बळीराजाला दु:ख होऊ नये म्हणून प्रजा आपलं दु:ख त्याच्या नजरेस पडणार नाही, आपण आनंदी आहोत असं दर्शवण्यासाठी नटते थटते. नवे कपडे, दागदागिने, घरादाराला रंगरंगोटी करुन खायला गोडधोड अन्नपदार्थ करुन खूप आनंदी असल्याचं दाखवते. आपली प्रजा सुखासमाधानात असल्याचं पाहून, बळीराजा आनंदी होतो आणि समाधानाने पुन्हा पाताळी जातो अशी ही आख्यायिका आहे आख्यायिका हि ऐकीव नसते तर पहिल्या पिढीने पाहिलेले पुढच्या पिढ्यांना सांगणे याला आख्यायिका असे म्हणतात. आता असा प्रश्न आहे, आपल्या प्रजेच्या सुखाने सुखी होणाऱ्या आणि प्रजेचं दु:ख पाहून दु:खी होणाऱ्या या थोर बळीराजाला विष्णुने वामनाचा अवतार घेऊन पाताळी का घातलं ?

जगतगुरू संत तुकाराम महाराजांनीही आपल्या एका अभंगातून,

''बळी सर्वस्वे उदार । ज्याने उभारीला कर ।।
त्याला करुनी कहार । पाताळी घातला ।।''

अशा स्पष्ट शब्दात या घटनेचा निषेध केला आहे. कहर म्हणजे टोकाचं नुकसान, भयंकर नुकसान, भयंकर जुलुम, अत्याचार ! तुकाराम महाराजांना पोथ्या-पुराणातून ज्या कथा सांगितल्या गेल्या त्यात दडलेल्या एका प्रदीर्घ सांस्कृतिक संघर्षाच्या इतिहासाची जाण होती. आपलं बळीराजा बरोबर असलेलं नातं त्यांना माहित होतं.

पण आजच्या बहुसंख्य कीर्तनकारांना याचं ज्ञानही नाही आणि जाणिवही नाही. त्यांना आजच्या कीर्तन पाठशाळेत जेवढं शिकवलं तेवढंच ते पाठ करतात आणि पोपटासारखी त्याचीच री ओढत राहतात यामुळे ते श्रोत्यांचीही दिशाभूल करत राहतात. अशिक्षित देवभोळीळ्या जनतेला फसवतात. ही जाणिव होण्यासाठी पोथ्यापुराणं चिकित्सकपणे अभ्यासली गेली पाहिजेत. त्यातलं सार-असार समजून घेतलं पाहिजे. यावर अभ्यास संशोधन केलेल्या संशोधकांचं लिखाण वाचलं पाहिजे. त्यावर चिंतन केलं पाहिजे. पोथ्यापुराणं ब्राह्मणांनी लिहून ठेवल्या. त्या लिहितांना त्यांचे उद्देश समाजावर स्वत:चं महत्त्व ठसवायचं, सर्वांच्या मनावर आपलं प्रभुत्त्व ठसवायचं असेच होते. त्यामुळे त्यांनी जे मांडलं ते जसंच्या तसं स्विकारणं हाच मुळात अज्ञानीपणा आहे. जगतगुरु संत तुकाराम महाराजांनी सांगितल्याप्रमाणे, 'सत्य असत्यासी मन ग्वाही' करुन योग्य, अयोग्य आपण स्वत: ठरवलं पाहिजे..! राहुल सांकृत्यायनांपासून, सत्यशोधक भाई माधवराव बागल, प्राच्यविद्यापंडित कॉम्रेड प्रा. शरद पाटील, डॉ. आ. ह. साळुंखे यांसारख्या अभ्यासकांनी, विचारवंतांनी, प्रकांडपंडितांनी जे संशोधन करुन सत्य मांडलं आहे ते समजून घेतलं पाहिजे. आपल्या रुढी सम जुती पेक्षा वेगळं काही असलं की लगेच त्यावर काहीतरी शिक्का मारुन पाठ फिरवणं ही संत तुकाराम महाराजांची शिकवण नाही. आपण तुकाराम महाराजांचे वारस आहोत. प्रस्थापित, जुलुमी समाज व्यवस्थेविरोधात बंड करणाऱ्या संतशिरोमणी नामदेव महाराज, धार्मिक ज्ञान फक्त संस्कृतमध्येच हा दंडक मोडून गीतेचं प्राकृत भाषेत भाषांतर करणाऱ्या बंडखोर संत ज्ञानदेवांचे आपण वारस आहोत. ''वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा । येरांनी वाहावा भार माथा ।।'' असं म्हणून धर्मशास्त्रावरची ब्राह्मणांची मक्तेदारी मोडून काढणाऱ्या आणि आपल्या बुद्धीने विचार करुन, ''वेदा वीर्यशक्ती नाही''; या निकषावर येणाऱ्या जगतगुरु संत तुकाराम महाराजांचे आपण वारस आहोत. वारकरी कोणावरही अंधविश्वास ठेवत नाहीत. आपल्या संतांनीच आपल्याला बंड करायला शिकवलं आहे. प्रश्न विचारायला शिकवलं आहे. आपल्या बुद्धीने विचार करायला शिकवलं आहे. संतांची ही शिकवण ध्यानी धरुन आपण दिवाळी साजरी करु या! फटाके मुक्त दिवाळी, प्रदुषणमुक्त दिवाळी, आपल्या आनंदात इतरांना सहभागी करुन घेणारी दिवाळी, इतरांचं दु:ख हलकं करणारी दिवाळी साजरी करु या..!

आपल्या सर्वांच्या मनात, सद्विचाराचे, संतविचाराचे, सत्याचे लक्ष लक्ष दीप उजळोत हीच संत तुकाराम महाराज व गाथा अभ्यासक परिवाराच्या वतीने आपणा सर्वांना दिवाळीच्या मन:पुर्वक शुभेच्छा !

चर्चा आजची

दिवाळीचा 'प्रकाश' हरवलाय...



दिवाळी म्हटली की प्रकाश, आनंद, उत्साह आणि समृद्धीचे चित्र डोळ्यांसमोर उभे राहते. घराघरांत पणत्या लागतात, आकाशकंदील झळकतात, बाजारपेठा गजबजतात आणि फराळाच्या सुगंधाने वातावरण दरवळते. मात्र, यंदाच्या दिवाळीच्या प्रकाशाला अनेक संकटांची काळी किनार आहे. पावसाने पाठ फिरवल्याने शिवारातील पिके करपली आहेत. जमिनीला भेगा पडल्या आहेत. हातात उत्पन्न नाही, डोक्यावर कर्जाचा डोंगर आहे. त्यामुळे शेतकरी हतबल झाला आहे. ज्याच्या कष्टांवर आपली दिवाळी गोड होते, त्याच्याच घरात आज चिंतेचा अंधार आहे.

हा अंधार केवळ शेतकऱ्यांच्या घरापुरता मर्यादित नाही. शिक्षणाच्या क्षेत्रातही अस्वस्थ करणारे चित्र आहे. पेपरफुटी आणि परीक्षांमधील गैरप्रकारांमुळे विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले जात आहे. भविष्य घडविण्यासाठी अभ्यास करणाऱ्या तरुणांना न्यायासाठी रस्त्यावर उतरावे लागत आहे. नोकरीच्या आशेने वर्षानुवर्षे तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्वप्नांवर व्यवस्थेतील त्रुटींचे सावट पडत आहे. परीक्षा पारदर्शक व्हाव्यात आणि दोषींवर कारवाई व्हावी, यासाठी आंदोलने होत आहेत. विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तकांऐवजी आंदोलनाचे फलक येणे, ही व्यवस्थेसाठी निश्चितच चिंतेची बाब आहे.

राकेश लोहार

दुसरीकडे, लोकशाहीच्या संस्थांच्या विश्वासार्हतेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. मतदारयाद्यांमधील कथित अनियमितता आणि एसआयआर प्रक्रियेच्या विरोधात निवडणूक आयोगाविरोधात आंदोलने झाली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विरोधी पक्षांनी रस्त्यावर उतरून आवाज उठवला. लोकशाहीत मतदानाचा अधिकार, पारदर्शक निवडणूक प्रक्रिया आणि घटनात्मक संस्थांवरील विश्वास या बाबी किती महत्त्वाच्या आहेत, याची जाणीव या आंदोलनांनी करून दिली.

एकीकडे दुष्काळाने शेतकरी अस्वस्थ आहे, दुसरीकडे पेपरफुटीने विद्यार्थी आक्रमक आहेत, तर लोकशाहीच्या प्रश्नांवर नागरिक रस्त्यावर उतरले आहेत. ही आंदोलने केवळ घोषणांची नसून व्यवस्थेकडून न्याय, उत्तरदायित्व आणि विश्वासाची अपेक्षा व्यक्त करणारी आहेत. समाजातील या अस्वस्थतेकडे दुर्लक्ष करून केवळ उत्सवाच्या रोषणाईत रमणे योग्य ठरणार नाही.

अर्थात, दिवाळीचा आनंद साजरा करू नये असे नाही. बाजारपेठा फुलल्या पाहिजेत, व्यापार वाढला पाहिजे, उद्योगांना चालना मिळाली पाहिजे आणि घराघरांत समृद्धी नांदली पाहिजे. पण, या आनंदात संकटग्रस्त माणसालाही सामावून घेतले पाहिजे. स्थानिक कारागीर, छोटे व्यावसायिक आणि कष्टकरी यांच्या हाताला काम मिळाले पाहिजे. गरजू कुटुंबांच्या घरातही फराळाचा गोडवा पोहोचला पाहिजे. शेतकऱ्यांच्या वेदना समजून घेऊन त्यांना दिलासा देणारी ठोस पावले उचलली गेली पाहिजेत. फक्त करण्यात येणारी मदतही फोटोत येण्यापुरती दिखावेगिरी असता कामा नये.

दिवाळी हा अंधारावर प्रकाशाचा विजय साजरा करणारा सण आहे. संत ज्ञानेश्वरांची 'दुरितांचे तिमिर जावो' ही प्रार्थना आजच्या परिस्थितीत अधिकच महत्त्वाची वाटते. कारण, अंधार केवळ घराबाहेर नसतो, तो कधी शेतकऱ्याच्या काळजात असतो, कधी विद्यार्थ्यांच्या भविष्यावर असतो, तर कधी लोकशाहीवरील विश्वास डळमळीत झाल्याने समाजाच्या मनात निर्माण होतो. हा अंधार दूर करण्यासाठी केवळ पणत्या नव्हे, तर संवेदनशील व्यवस्था, न्यायाची भूमिका आणि माणुसकीची साथ आवश्यक आहे. त्यामुळे प्रजेचे दु:ख पुसण्यासाठी, त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसण्यासाठी मायबाप सरकारकडून केवळ घोषणा नकोत, तर कायमस्वरुपी उपाययोजनांची गरज आहे.

प्रत्येकाच्या आयुष्यात आशेचा नवा किरण उजळू दे, शेतकऱ्यांच्या शिवारात पुन्हा हिरवळ फुलू दे, विद्यार्थ्यांच्या मेहनतीला न्याय मिळू दे, तरुणांच्या स्वप्नांना बळ मिळू दे आणि लोकशाही अधिक सक्षम होऊ दे, कोणाच्याही घरात अभावाचा अंधार राहू नये, कोणाच्याही स्वप्नांची राख होऊ नये आणि प्रत्येकाला सन्मानाने जगण्याची संधी मिळावी, अशी अपेक्षा या प्रकाशपर्वानिमित्ताने अधिक उजळणारी वाटतेय. पण, त्यासाठीची जबाबदारी सरकारची आहे, धोरणकर्त्यांची आहे. यंदाची परिस्थिती फार बिकट आहे. त्यामुळे अडचणीत असणाऱ्यांना मदतीचा हात देऊन सावरण्याचे बळ प्रत्येकामध्ये हवेय. कारण, आज दुष्काळाने शेतकरी हतबल, पेपरफुटीने विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात; लोकशाहीच्या रक्षणासाठी रस्त्यावर उतरलेला समाज... अशा अस्वस्थ वर्तमानात माणुसकीचा दिवा तेवत ठेवण्याची नितांत गरज आहे. म्हणूनच दिवाळीच्या पणत्या प्रत्येक अंगणात उजळोत; पण त्या प्रकाशात कोणाचेही दु:ख झाकोळले जाऊ नये. सर्वांच्या आयुष्यात सुख, समाधान, समृद्धी आणि आशेचा प्रकाश पडो, हीच मनापासून सदिच्छा! सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

लोकसंसद

..तर ११७ वर्षांची परंपरा अखंडपणे सुरू राहील!

मराठी माणूस, दिवाळी आणि दिवाळी अंक यांचे अतूट असे एक सांस्कृतिक नाते आहे. दिवाळीची वैशिष्ट्ये म्हणजे दिवाळीचा फराळ, आकर्षक आकाश कंदील, पणत्या, रांगोळ्या आणि त्याचबरोबर वाचकांना बौद्धिक खुराक देणारे दिवाळी अंक! अशा या आपल्या दिवाळी अंकांना एकशेसतरा वर्षांची दीर्घ परंपरा लाभली असून अनेक मराठी ज्येष्ठ आणि प्रतिथयश साहित्यिकांच्या साहित्यिक कारकिर्दीची सुरुवात दिवाळी अंकांतूनच झाली. उदाहरणार्थ संपादक काशिनाथ रघुनाथ मित्र (आजगावकर) यांच्या १९०९ साली प्रसिद्ध झालेल्या 'मनोरंजन' मासिकाच्या पहिल्या वहिल्या दिवाळी अंकात बालकवींची सुप्रसिद्ध 'आनंदी आनंद गडे' ही कविता प्रसिद्ध झाली होती. विविध विषयांवरचे मान्यवरांचे माहितीपूर्ण लेख, ललित लेख, कथा, कविता, तत्कालीन विषयांवरील चर्चात्मक संवाद अशा अनेक प्रकारचा दर्जेदार मजकूर दिवाळी अंकांमधून प्रकाशित केला जातो. मात्र ११७ वर्षांपूर्वी सुरू झालेली ही मराठी संस्कृतीची गौरवशाली परंपरा आज एका अत्यंत आव्हानात्मक वळणावर उभी आहे. आपले अवघे आयुष्य मोबाईलच्या स्क्रीनने व्यापल्यामुळे आज एकूणच वाचन कमी झाले आहे. त्यातच इंग्रजी माध्यमांचा वाढता प्रभाव, डिजिटल वाचनाचा पर्याय, जाहिराती कमी होणे आणि आर्थिक अडचणींचा वाढता डोंगर अशा कारणांमुळे दिवाळी अंकांवर आज मोठे संकट ओढवले आहे. मात्र अशाही नाजूक परिस्थितीत प्रकाशक आणि संपादकांनी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरून वाचकांच्या आवडीनुसार बदल केल्यास ही ११७ वर्षांची परंपरा पुढील अनेक वर्षे त्याच उत्साहात अखंडपणे सुरू राहील यात शंका नाही. **– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

राष्ट्रीय कायदेशीर सेवा दिन

भारतीय राज्यघटनेनुसार प्रत्येकाला आपल्याविरुद्ध घडलेल्या घटनांबाबत न्यायालयाकडून न्याय मागण्याचा पूर्ण अधिकार आहे. यासाठी स्थानिक न्यायालयापासून ते सर्वोच्च न्यायालयापर्यंत प्रत्येक नागरिकाला न्याय आणि हक्क मिळवून देण्यासाठी ते कटिबद्ध राहतात. राष्ट्रीय विधी सेवा दिन दरवर्षी ९ नोव्हेंबर रोजी कायदेशीर नियमांना अधोरेखित करण्यासाठी आणि स्पष्ट करण्यासाठी आणि भारतातील कायदेशीर सेवा योग्य रीतीने सादर करण्यासाठी साजरा केला जातो जेणेकरून नागरिक कोणत्याही सेवेमध्ये मागे राहू नयेत. राष्ट्रीय कायदेशीर सेवा दिन दरवर्षी ९ नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. १९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण कायद्याच्या मंजुरीचा सन्मान करण्यासाठी ही तारीख निश्चित करण्यात आली, जो कायदा ९ नोव्हेंबर १९९५ रोजी अंमलात आला. न्याय मिळवणे हा केवळ श्रीमंतांचा विशेषाधिकार नसून, वंचित आणि गरीब पार्श्वभूमीच्या नागरिकांसह सर्व नागरिकांचा हक्क आहे, हे सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने या दिवसाचे आयोजन हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. या दिवसाचे उद्दिष्ट म्हणजे सर्व नागरिकांना न्याय मिळवून देणे आणि विशेषत: आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकांसाठी न्यायप्रविष्ट होण्याच्या मार्गात असलेल्या अडचणी दूर करणे होय. भारताच्या संविधानानुसार प्रत्येक नागरिकाला न्याय मिळणे हे मूलभूत हक्क आहे, परंतु अनेक वेळा आर्थिक अडचणींमुळे गरीब वर्गासाठी न्याय मिळवणे कठीण होते. राष्ट्रीय कायदेशीर सेवा दिनाच्या निमित्ताने, विविध कायदा सेवा प्राधिकरणे व न्यायालये मोफत कायदेविषयक सल्ला, तक्रारींचे निवारण आणि जनजागृती अभियान राबवतात. या दिवसाचा उद्देश म्हणजे लोकांमध्ये त्यांच्या हक्कांविषयी जागरूकता वाढवणे आणि न्याय व्यवस्थेत त्यांचा विश्वास वाढवणे होय. विधी सेवा दिनानिमित्त कळले तर आता केस नसतानाही न्यायालयाकडून मदत आणि न्याय मिळत आहे. सरकारी उणिवा उघड करून लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी न्यायालयही बाहेर काम करत आहे. या सेवांसाठी कोणतेही न्यायालय काम करत नाही परंतु कायदेशीर सेवा सर्वत्र इतकी सोपी करण्यात आली आहे की लगेच न्याय मिळतो.

बळी नुकसान भरपाई योजना

येथील विधी दिनानिमित्त ही योजना समजून घेतली, तर जिल्हा वि

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

९ नोव्हेंबर

१) श्री. नारायण गणपत पवार
चेंढरे-अलिबाग, ९-११-१९३५
२) श्री. सुभाष पुरूषोत्तम क्षीरे
चेंढरे-अलिबाग, ९-११-१९४०
३) श्री. अशोक वसंत म्हात्रे
चेंढरे-अलिबाग, ९-११-१९४४
४) श्री. सुमंत अनंत म्हात्रे
थळ-अलिबाग, ९-११-१९४२
५) श्री. लायकअल्ली अब्दुल अनवारे
अलिबाग, ९-११-१९५३

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

आजचे अन्नदाते

प्रभावती महादेव पाटील, स्मरणार्थ अलिबाग

सुधागडमध्ये अवकाळीचा शेतीला फटका

■ भात-कडधान्य पिकांचे नुकसान; तातडीने पंचनाम्यांची मागणी

। पाली । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यात सोमवारी (दि.२) नोव्हेंबरच्या मध्यरात्रीपासून अचानक झालेल्या मुसळधार अवकाळी पावसामुळे संपूर्ण तालुक्यातील शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. या नैसर्गिक संकटामुळे बळीराजा हवालदिल झाला आहे. या पार्श्वभूमीवर सुजित बारसकर व पदाधिकारी आणि शेतकरी यांनी मंगळवारी (दि. ३) पाली-सुधागड तहसीलदारांना निवेदन देत तातडीने संयुक्त पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे.



सध्या तालुक्यात भात कापणी व मळणी अंतिम टप्प्यात होती. मात्र, अचानक आलेल्या पावसामुळे शेतात कापून ठेवलेले भात पाण्यात भिजले असून, उभे पीक जमिनीवर लोळल्यामुळे धान्याला अंकुर फुटण्याची व सडण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

कडधान्याची पिके पाण्याखाली गेल्यामुळे हातात आलेले पीक पूर्णपणे वाया गेले आहे. शेतकऱ्यांनी अत्यंत कष्टाने पिकवलेले पीक डोळ्यांसमोर नष्ट झाल्यामुळे तालुक्यातील शेतकरी वर्ग पूर्णपणे खचला असून त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे.

परिणामी सुधागड तालुक्यातील महसूल मंडळांमधील बाधित भात व कडधान्य शेतीचे कृषी विभाग, महसूल विभाग आणि विमा कंपनीमार्फत तातडीने संयुक्त पंचनामे सुरू करण्यात यावेत.

> **प्रशासनाने या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन कोणत्याही प्रकारचा विलंब न करता तातडीने शेतावर जाऊन पंचनामे करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना लवकरात लवकर द्यावेत.**
> **– सुजित बारसकर**

पंचनाम्याची प्रक्रिया अत्यंत पारदर्शकपणे राबवून एकाही बाधित शेतक्याला यापासून वंचित ठेवले जाऊ नये.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासकीय स्तरावरून तातडीने सानुग्रह अनुदान व पीक विमा भरपाई मिळवून देण्यासाठी शासनाकडे आवश्यक ते प्रस्ताव त्वरित पाठवण्यात यावेत. अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांवर दुःखाचे सावट

सध्या भातपीक काढणीस पूर्णपणे तयार असून, काही शेतकऱ्यांनी कापणीच्या कामाला सुरुवातही केली आहे. अशातच अवकाळी पावसाने अचानक तडाखा दिल्याने उभे भातपीक तसेच कापणी करून शेतात ठेवलेले पीक भिजले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यांदेखत त्यांच्या मेहनतीने पिकवलेल्या भाताचे नुकसान होत असून, शेतकऱ्यांवर दुःखाचे सावट आले आहे.

भाताच्या दाणे भरण्याच्या अखेरच्या टप्प्यात पावसाने पुन्हा ताण दिल्याने शेतकर्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.

निवेदन देतेवेळी सुजित बारसकर, वैभव शिंदे, शशिकांत पाशिलकर, संजय कडू आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खैराच्या वृक्षांची खुलेआम कत्तल

। शहापूर । प्रतिनिधी ।

शहापूर तालुक्यातील तानसा अभयारण्याच्या हद्दीतील वेहलोंढे गावाच्या डोंगरशेत परिसरात खैराच्या मौल्यवान वृक्षांची मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. परिसरातील डोंगरशेत भागात मोठमोठी झाडे तोडली जात असल्याने वनसंपत्तीची अक्षरशः लूट सुरू असल्याने संताप व्यक्त होत आहे. खैराच्या लाकडाला बाजारात मोठी मागणी आणि किंमत असल्याने या वृक्षांची बेकायदा तोड करून तस्करी केली जात असल्याची चर्चा परिसरात आहे.

विशेष म्हणजे मागील महिन्यातही याच परिसरात वृक्षतोडीची घटना घडली होती. त्यावेळी या प्रकाराला वृतपत्राच्या माध्यमातून वाचा फोडण्यात आली होती. मात्र त्यानंतरही पुन्हा वृक्षतोडीचा प्रकार समोर येत असल्याने वनविभागाच्या कारवाईबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



यापूर्वीच्या घटनेनंतर संबंधित विभागाने नेमकी कोणती कारवाई केली, वृक्षतोड करणाऱ्यांचा शोध घेतला का, लाकडाची वाहतूक आणि तस्करी रोखण्यासाठी कोणती उपाययोजना केली. असे अनेक प्रश्नउपस्थित होत आहेत.

तानसा अभयारण्य हे जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे संरक्षित वनक्षेत्र आहे. अशा संवेदनशील परिसरात मौल्यवान वृक्षांची कत्तल होत असेल तर ही केवळ पर्यावरणाची हानी नसून वन्यजीवांच्या अधिवासावरही घाला आहे.

जंगलातील मोठमोठी झाडे नष्ट होत असताना वनरक्षकांची गस्त, तपासणी आणि नियंत्रण यंत्रणा नेमकी काय करत आहे. असा संतप्त सवाल पर्यावरणप्रेमींकडून उपस्थित केला जात आहे.

संबंधित विभागाने आता केवळ पंचनामा करून प्रकरण गुंडाळण्याऐवजी वेहलोंढेच्या डोंगरशेत परिसराची प्रत्यक्ष पाहणी करावी. मागील महिन्यातील वृक्षतोडीच्या घटनेपासून आतापर्यंत तोडलेल्या खैराच्या झाडांची संख्या निश्चित करावी, लाकडाच्या वाहतुकीचे मार्ग शोधावेत आणि या प्रकारामागील सूत्रधारांचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

सर एस.ए. हायस्कूलमध्ये पारितोषिक वितरण

। कोर्लई । प्रतिनिधी ।

मुरुडच्या सर एस.ए.हायस्कूलमध्ये रायगड गणित विज्ञान अध्यापक मंडळाची गणित संबोध परीक्षा २०२४-२५ तालुकामुरुडचापारितोषिकवितरण सोहळा रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभाग शिक्षणाधिकारी ललिता दहितुले मान्यवरांच्या हस्ते तालुका पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी रायगड जिल्हा परिषदेचे शेडगे, मुख्याध्यापक सरोज राणे, अर्चना खोत, केंद्र प्रमुख कवळे, पाटील, प्रवीण भगत, मीना मोरे, संदेश चोरघे, सुरेश मोरे उपस्थित होते.

राष्ट्रीय एकता रॅलीचे खोपोलीत स्वागत

। खोपोली । प्रतिनिधी ।

नशामुक्त भारताचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी दक्षिण भारतातील पाच राज्यांमधून निघालेल्या राष्ट्रीय एकता रॅलीचे खोपोलीत जिल्हा पोलिसांच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले. सुमारे ४० ते ५० पोलीस बाईकस्वारांचा सहभाग असलेल्या या रॅलीत दोन महिला पोलीस अधिकाऱ्यांचाही समावेश होता. २०२९ पर्यंत भारत नशामुक्त करण्याच्या उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती खालापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल पाटील यांनी सांगितले.

पोलीस अधिकाऱ्यांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल पाटील यांनी हिरवा झेंडा दाखविल्यानंतर रॅली पुढील प्रवासासाठी मार्गस्थ झाली. याप्रसंगी एस. सुरेश, पी. एन. डी. प्रसाद, सेलवादूराय, रिनीश चंद्र, विशाल, खोपोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन हिरे, राजेंद्र फक्के, गुरुनाथ साठेलकर आदी उपस्थित होते.

प्रा. मांजरेकर सायकलिंगमध्ये विक्रम

■ २३५ कि.मी. प्रवास १४ तासांत पूर्ण

। तळे । प्रतिनिधी ।

ध्येय निश्चित असेल आणि मनात जिद्द असेल, तर वय किंवा परिस्थिती आड येत नाही, याचा प्रत्यय वामनराव महाडिक माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य अविनाश मांजरेकर यांनी दिला आहे. त्यांनी कणकवली ते गोव्यातील मांद्रे-हरमल आणि पुन्हा कणकवली असा तब्बल २३५.८६ किलोमीटरचा सायकल प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण केला. रविवारी (दि. १) पहाटे ५ वाजता सुरू झालेली ही मोहीम सुमारे १४ तासांच्या प्रवासानंतर पूर्ण झाली.



पहाटेच्या शांत वातावरणात कणकवलीतून त्यांनी सायकल मोहिमेला सुरुवात केली. कुडाळ, सावंतवाडी, आरोंदा, किरणपाणी, हरमल असा प्रवास करीत ते गोव्यातील निसर्गरम्य मांद्रे येथे पोहोचले. तेथे देवीचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी पुन्हा कणकवलीच्या दिशेने परतीचा प्रवास सुरू केला.

या संपूर्ण मोहिमेत त्यांनी ७ तास ३० मिनिटांहून अधिक काळ प्रत्यक्ष पॅडलिंग केले. १४ तासांच्या प्रवासात २३५.८६ किलोमीटरचे अंतर पार करणे ही त्यांच्या सायकलिंगमधील आवडीची आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांची प्रचिती देणारी कामगिरी ठरली.

पालघर जिल्ह्यात भूकंपाचा धक्का

■ तलासरीत २.८ रिश्टर स्केलची नोंद

। पालघर । प्रतिनिधी ।

जिल्ह्यात भूकंपाचे सत्र पुन्हा सुरू असून, शनिवारी तलासरी तालुक्यात संध्याकाळी साडेसहाच्या दरम्यान २.८ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंपाचा धक्का जाणवला. या भूकंपाचा केंद्रबिंदू कुरझे परिसरात असल्याची नोंद झाली आहे. केंद्रबिंदूपासून सुमारे पाच किलोमीटरच्या परिघात भूकंपाची नोंद झाल्याने परिसरातील भूकंपाच्या हालचाली पुन्हा चर्चेत आल्या आहेत.

विशेष म्हणजे याच परिसरात ३१ ऑक्टोबरला एकाच दिवशी दोन भूकंपाचे धक्के जाणवले होते. त्या वेळी अनुक्रमे ३.२ आणि २.१ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाची नोंद झाली होती. त्यानंतर शनिवारी पुन्हा २.८ रिश्टर स्केलचा धक्का बसल्याने तलासरी आणि परिसरातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

पालघर जिल्ह्यातील डहाणू, तलासरी आणि विक्रमगड परिसरात यापूर्वीही सातत्याने भूकंपाचे सौम्य धक्के नोंदवले गेले आहेत. त्यामुळे या भागातील भूकंपप्रवण क्षेत्राचा अभ्यास, भूकंपाच्या नोंदींचे विश्लेषण आणि नागरिकांमध्ये जनजागृती करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. दरम्यान, या धक्क्यामुळे कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झाली नसली तरी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण कायम आहे. भूकंपाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने नागरिकांना घाबरून न जाता सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना धनादेश वाटप

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान नगरपरिषद मध्ये वयाची ५८ वर्षे पूर्ण होईपर्यंत सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्तीनिमित्त धनादेश देण्यात आले. तर माथेरान शहरातील तीन सिंड्रोला बालिका यांच्या औषध उपचारासाठी पाच लाखांचा निधी बँकेत फिक्स डिपॉझिट म्हणून ठेवण्यात आली. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतरचे लाभाचा धनादेश नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्या हस्ते देण्यात आले.

मुरूड तालुक्यात भातकापणीला सुरुवात

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

खरीप हंगामातील प्रमुख पीक असलेल्या भाताची मुरूड तालुक्यात सुमारे ३३०० हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्यात आली आहे. हवामानाच्या लहरीपणामुळे अपेक्षित उत्पादन मिळण्याची आशा धूसर झाली असतानाच, जे काही पीक पदरात पडले आहे ते सुरक्षितपणे घरात आणण्यासाठी शेतकऱ्यांची लगबग सुरू झाली आहे.



शेतकऱ्यांनी भातकापणीला सुरुवात केली असून शेतशिवारात कापणीची कामे वेगाने सुरू केली आहेत.

निसर्गाच्या बदलत्या चक्राशी झुंज देत शेतकरी उरलेले पीक पदरात पाडून घेण्यासाठी धडपडत आहेत. मेहनतीने पिकविलेला सोनेरी दाणा घरात आणण्याची आशा मनात ठेवून शेतकरी भातकापणीत व्यस्त झाले आहेत.

मार्गावर १७ स्थानके येणार उभारण्यात | प्रवाशांना सोयीस्कर प्रवासाचा पर्याय उपलब्ध

पनवेल-वसई रेल्वे कॉरिडॉरला गती

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबई महानगर प्रदेशाच्या दृष्टीने महत्त्वाच्या पनवेल-वसई उपनगरी रेल्वे कॉरिडॉरच्या उभारणीच्या प्रक्रियेला गती मिळाली असून तब्बल ६९.२३ किमी लांबीच्या या मार्गिकेसाठी १२,७१० कोटी ८२ लाख रुपयांचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला आहे. मुंबई महानगर प्रदेशाच्या दृष्टीने महत्त्वाच्या पनवेल-वसई उपनगरी रेल्वे कॉरिडॉरच्या उभारणीच्या प्रक्रियेला गती मिळाली असून तब्बल ६९.२३ किमी लांबीच्या या मार्गिकेसाठी १२,७१० कोटी ८२ लाख रुपयांचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला आहे. त्यामुळे प्रवाशांना पनवेल ते वसई थेट लोकल सेवेचा लाभ मिळणार आहे.



मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या अंतर्गत प्रस्तावित असलेल्या या मार्गावर १७ स्थानके उभारण्यात येणार असून, महामार्ग आणि खाड्यांमुळे निर्माण होणारे अडथळे टाळण्यासाठी सुमारे २८ किमीचा मार्ग उन्नत स्वरूपात बांधण्यात येणार आहे. केंद्राच्या आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरीनंतर या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचा मार्ग मोकळा होणार आहे. सध्या पनवेलहून वसई-विरार परिसरात जाण्यासाठी थेट लोकल सेवा उपलब्ध नाही.

त्यामुळे प्रवाशांना कुर्ला, दादर किंवा अन्य स्थानकांवर रेल्वेगाड्या बदलून प्रवास करावा लागतो.

पनवेल ते वसईदरम्यान थेट उपनगरी रेल्वेसेवा उपलब्ध होऊ शकेल. त्यामुळे पूर्व आणि प. उपनगरांमधील प्रवासाचा वेळ आणि रेल्वे बदलण्याचा त्रास कमी होण्याची अपेक्षा आहे.नवी मुंबई, भिवंडी आणि वसई-विरार परिसरात नागरी वसाहतींसह औद्योगिक क्षेत्रांचा विस्तार वेगाने होत आहे.

वाढती लोकसंख्या आणि नव्याने विकसित होणारी रोजगार केंद्रे यांमुळे या भागांतील सार्वजनिक वाहतुकीची गरजही वाढत आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तावित पनवेल-वसई रेल्वे कॉरिडॉर हा मुंबई महानगर प्रदेशातील उपनगरी रेल्वेचे जाळे विस्तारण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. तिसरी आणि चौथी मुंबई म्हणून विकसित होत असलेल्या नव्या नागरी क्षेत्रांना रेल्वेची जोड मिळाल्यास रस्ते वाहतुकीवरील अवलंबित्व कमी होण्यासह प्रवाशांना जलद आणि सोयीस्कर प्रवासाचा पर्याय उपलब्ध होईल, तसेच या भागांतील औद्योगिक आणि व्यावसायिक विकासालाही चालना मिळू शकेल.

केंद्र सरकारच्या मंजुरीची प्रतीक्षा

पनवेल-वसई रेल्वे प्रकल्पाला महाराष्ट्र सरकारच्या पायाभूत सुविधा समितीने यापूर्वीच मंजुरी दिली आहे. त्यानंतर आता या प्रकल्पासाठी १२ हजार ७१० कोटी ८२ लाख रुपयांचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला आहे. केंद्र सरकार आणि रेल्वे मंत्रालयाकडून आवश्यक प्रशासकीय आणि आर्थिक मंजुरी मिळाल्यानंतरच पुढील कामांना सुरुवात होऊ शकणार आहे.

निवडक



भारतीय विद्या संकुलात'दीपोत्सव'साजरा

नागोठणे : नागोठण्यातील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या वेलशेत येथील विद्यासांकलात दिवाळी सणाचे औचित्य साधून 'दीपोत्सव २०२६' या कार्यक्रमाचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. या निमित्ताने संस्थेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांमध्ये कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आनंदाचे वातावरण निर्माण केले. तसेच संस्थेच्या वतीने सर्व कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त स्नेहभेट देऊन दीपावलीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष किशोर जैन, संगीता जैन, कार्तिक जैन, सुरेश जैन, वैभव नांदगावकर, प्राचार्य डॉ. अर्चिस पाटील, प्राचार्य डॉ. आशीष पगारिया, प्राचार्य डॉ. प्रवेश यादव, प्राचार्य सतीश सुर्वे, डॉ. संदेश शिंदे यांच्यासह सर्व वैद्यकीय अधिकारी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण धसाडे यांनी केले.



महिला बचत गटातर्फे दिवाळी प्रदर्शन

माथेरान : माथेरान गिरीस्थान नगर परिषदेच्या विद्यमाने त्याचप्रमाणे महिला बचत गटाच्या पुढाकाराने स्थानिक महिला उद्योजकांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी दिवाळी प्रदर्शन व विक्री महोत्सव या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. असेंबली हॉलच्या प्रांगणात ५ ते १६ नोव्हेंबर दरम्यान सायंकाळी चार ते रात्र नऊ वाजेपर्यंत या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये स्थानिक महिला बचत गटांनी स्वनिर्मित केलेल्या आकर्षक आकाश कंदील उटणे, फराळ साहित्य, सजावटीचे साहित्य, गृहपयोगी वस्तू, त्याचप्रमाणे विविध हस्तकलेंच्या वस्तूंचे भव्य प्रदर्शन व विक्री करण्यात येत आहे. यासाठी ऐश्वर्या शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व नगरसेविकांनी या महत्वपूर्ण कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले आहेत.



पालीत वृक्षतोडीविरोधात कवीसंमेलन

चिरनेर : कर्जत साय डोंगरात झाडांची मोठ्या प्रमाणात कत्तल झाली आहे त्या विरोधात कोमसाप रायगड यांनी पाली येथे प्रा. एल बी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन घेतले. संमेलनाची सुरुवात अरं सरकारा, दुष्ट सरकारा तू भस्मासुर हाय या आगरी कवितेने झाली. या कवितेला शेतकऱ्यांकडून मोठी दाद मिळाली. या संमेलनात जनार्दन सटाणे यांनी विद्रोहाची उंची वाढविली. कॉम्रेड गोपाळ शेळके यांनी सरकारच्या पापी कृत्यांचा पाढा वाचला. तर कवयित्री अक्षता गोसावी, नरेश पाटील, वसंत मोहिते, रामदास गायधने, भारती ढकवळ, ॲड संतोष जोहेकर, ॲड.कल्पना वाळिंजे, जनार्दन, अनंत भोईर, दामोदर गायकवाड, अनंत पाटील, महेश बार्शी, मारुती बागडे प्रकाश रेड्डी, अप्पा ठाकूर, प्राचार्य अजित मगदूम, सुभाष लानदे, प्रदीप मुंबईकर, ॲड सतीश शेळके, वृषाली मगदूम, आर्दीने कवितांचे सादरीकरण केले.



प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटनेच्या मागण्या मान्य

उरण : स्थानिक बेरोजगार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना रोजगार मिळावा, या प्रमुख मागणीसाठी मास्टर मरीन मेहर यार्ड, खोपटे येथे मोठेखार (वरचा भाग) प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटनेच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या गेट बंद आंदोलनाला अखेर यश आले आहे. सामाजिक कार्यकर्ते अजित म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली २९ ऑक्टोबर रोजी सुरू झालेले हे आंदोलन ३१ ऑक्टोबर रोजी यशस्वीरीत्या संपन्न झाले. या आंदोलनाला संतोष ठाकूर, सुधाकर पाटील, एल. बी. पाटील, रवी घरत, रुपेश पाटील, कविता पाटील, दीपक भोईर, विनोद म्हात्रे, सत्यवान भगत, अविनाश ठाकूर, विश्वनाथ पाटील, ॲड. आशिष घरात, ॲड. धनेश्वर ठाकूर, महेंद्र पाटील, राजन पाटील, किरण म्हात्रे, वैभव ठाकूर, पराग ठाकूर, अजित पाटील, विठ्ठल ममताबादे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून पाठिंबा दिला. आंदोलन शांततेत पार पडण्यासाठी उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर, विजय चौधरी, पोलीस प्रशासन, प्रशासकीय यंत्रणांनी महत्त्वपूर्ण सहकार्य केले. प्रिती पाटील, विशाखा ठाकूर, अशोक भगत, सुजित म्हात्रे, रितेश ठाकूर, संतोष पाटील, अलंकार पाटील, कुमार ठाकूर, सर्व पदाधिकारी, सात पाड्यांतील पदाधिकारी, ग्रामस्थांनी आंदोलनाला पाठिंबा दिला होता.

दिवाळीत भेसळखोरांना दणका

रत्नागिरी : दीपावली सणाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या अन्न व्यावसायिकांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने धडक मोहीम हाती घेतली आहे. या विशेष तपासणी मोहिमेत रत्नागिरी शहर, ग्रामीण भाग आणि दापोली परिसरातील विविध आस्थापनांची तपासणी करून मिठाई, खवा, खाद्यतेल, फरसाण, बेसन, मैदा आणि कोकम आगळ यांसह विविध अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला.

दिवाळीत उन्हामुळे रत्नागिरीकर घामाघूम

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

रत्नागिरी जिल्ह्यात मागील काही दिवसापासून थंडी गायब झाली असून कडक उन्ह पडत असल्यामुळे जिल्हा तापू लागला आहे. उन्हाचा पारा ३५ अंशाच्या पुढे जात आहे. वाढत्या उकाड्यामुळे रत्नागिरीकर हैराण झाले आहेत. दिवसा कडक उन्ह, संध्यकाळी असा खेळ सुरू आहे. दुसरीकडे शेतकरी भातपिकाची कापणी, झोडणी सुरूच आहे. जिल्ह्यात मागील आठवड्यात लांजा, संगमेश्वर, रत्नागिरी, दापोलीसह इतर तालुक्यात परतीच्या पावसाने हजेरी लावली होती. त्यामुळे उकाड्यापासून नागरिकांना दिलासा मिळाला होता. तर शेतकऱ्यांच्या भात पिकाला मोठा फटका बसला असून मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाले. त्यानंतर आता काही दिवसापासून पाऊस गायब झाला आहे.

विमानतळ मार्गावरील दिशादर्शक फलक गायब

|| ठाणा नाका परिसरात वाहनचालक संभ्रमात || फलक उभारण्याची वाहनचालकांची मागणी

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाण्यासाठी पनवेल परिसरातून नव्या मार्गांची सुविधा उपलब्ध होत असताना दुसरीकडे दिशादर्शक फलकांचा अभाव वाहनचालकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. पनवेलमधील ठाणा नाका तसेच कर्नाळा स्पोर्ट्स अकादमी येथून सुरू झालेल्या विमानतळाकडे जाणाऱ्या उड्डाणपुलाच्या परिसरात दिशादर्शक फलक नसल्याने दुचाकी आणि चारचाकी वाहनचालकांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे.



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणाऱ्या मार्गावरील वाहतूक अधिक सुलभ व्हावी, यासाठी विविध पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात येत आहे. कर्नाळा स्पोर्ट्स अकादमी येथून विमानतळाच्या दिशेने जाणाऱ्या उड्डाणपुलाचे उद्घाटन मागील महिन्यात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले होते. या पुलामुळे विमानतळाकडे जाणाऱ्या वाहनचालकांना अधिक वेगवान आणि सोयीस्कर मार्ग उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.

मूलभूत सुविधांकडे होतोय दुर्लक्ष

विमानतळाकडे जाणाऱ्या मार्गावर आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू असताना दिशादर्शक फलकांसारख्या मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष का, असा प्रश्न वाहनचालक उपस्थित करीत आहेत.

मात्र, प्रत्यक्षात या मार्गावरून प्रवास करताना दिशादर्शक फलक नसल्याची अडचण वाहनचालकांना जाणवत आहे. ठाणा नाका परिसरातून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या दुचाकी आणि चारचाकी वाहनचालकांना कोणत्या मार्गाने पुढे जायचे, याबाबत स्पष्ट माहिती मिळत नाही. त्यामुळे अनेक वाहनचालक रस्त्यावरच गोंधळलेले दिसतात.

विशेषम्हणजे, विमानतळाकडे जाण्यासाठी नव्या मार्गांची निर्मिती होत असताना या मार्गांवर योग्य ठिकाणी दिशादर्शक फलक लावणे तितकेच महत्त्वाचे आहे. मुंबईकडे जाणाऱ्या वाहनचालकांना तसेच विमानतळाकडे जाणाऱ्या प्रवाशांना योग्य मार्ग समजण्यासाठी फलकांची आवश्यकता आहे.

दिशादर्शक फलक नसल्याने वाहनचालकांना ऐन वळणावर वाहनांचा वेग कमी करावा लागतो. काही वेळा चुकीच्या मार्गाने गेल्यानंतर पुन्हा माघारी फिरण्याची वेळ येते. त्यामुळे वाहतुकीचा खोळंबा होण्याबरोबरच अपघाताची शक्यताही नाकारता येत नाही.

प्रशासनाने ठाणा नाका आणि कर्नाळा स्पोर्ट्स अकादमी परिसरातील महत्त्वाच्या वळणांवर मुंबई, पनवेल आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणारे स्पष्ट दिशादर्शक फलक तातडीने उभारावेत, अशी मागणी दुचाकी व चारचाकी वाहनचालकांकडून होत आहे.

निवडक



आदिवासी बांधवांसोबत दीपोत्सव

पनवेल : समाजातील प्रत्येक घटकापर्यंत सणांचा आनंद पोहोचावा आणि वंचित घटकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलावे, या सामाजिक भावनेतून जाणीव एक सामाजिक संस्थेच्या वतीने खारघर येथील चाफेवाडी आणि फणसवाडी परिसरातील आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी करण्यात आली. यावेळी आदिवासी कुटुंबांना दिवाळी फराळाचे वाटप करून सणाचा आनंद द्विगुणित करण्यात आला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नितीन पाटील यांच्या माध्यमातून सातत्याने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येतात. याच सामाजिक बांधिलकीचा भाग म्हणून हा दिवाळी फराळ वाटपाचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. दिवाळीचा आनंद केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता समाजातील प्रत्येक घटकासोबत तो वाटून घेणे, आपुलकीची नाती अधिक दृढ करणे आणि सामाजिक एकोपा जपणे हा या उपक्रमामागील उद्देश होता. आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी करत संस्थेने सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला. याप्रसंगी नितीन पाटील, मधु पाटील, प्रवीण पाटील, संजय घरत, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, जितेंद्र मढवी तसेच अन्य मान्यवर आणि आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



'सा रायगड मनोगत'च्या अंकाचे प्रकाशन

पनवेल : स्वामी समर्थांचे अध्यात्मिक विचार, शिकवण आणि जीवनमूल्ये समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य 'सा. रायगड मनोगत' या साप्ताहिकाच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने सुरू आहे. अध्यात्माच्या माध्यमातून समाजाला सकारात्मक विचारांची दिशा देण्याचे काम साप्ताहिक करीत असून, त्यांचा हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन मठाधिपती सुधाकर घरात यांनी केले. 'सा. रायगड मनोगत'च्या दिवाळी विशेषांकाच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. याप्रसंगी ॲड. प्रथमेश सोमण, आर्या प्रवीण जाधव, प्रवीण जाधव, संजय कदम, प्रशांत शेडगे, दीपक महाडिक, भालचंद्र जुमलेदार, राजेश डांगळे, दिनेश गिल्डा, नानू वाघे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर तसेच स्वामी समर्थांचे भक्त आणि सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दुर्गम वाडीत उजळला माणुसकीचा दीप

पाताळगंगा : खालापूर तालुक्यातील डोंगरमाथ्यावर वसलेल्या नढाळ ठाकूरवाडी या छोट्याशा आदिवासी वाडीतील रायगड जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना दिवाळीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत आनंदाचा दीपोत्सव साजरा करण्यात आला. दुर्गा इस्टेट एजन्सी प्रा. लि. यांच्या वतीने संचालक ॲड. सागर वाणी, ॲड. स्वप्नाली वाणी यांच्या माध्यमातून वाडीतील ३३ आदिवासी कुटुंबांना दिवाळी फराळासह जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. दिवाळीच्या सणानिमित्त मिळालेल्या भेटवस्तूंमुळे आदिवासी बांधवांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले होते. यावेळी स्वप्नील सोनटक्के, दीपक ठाकूर, विनायक पाटील, अद्विक पाटील, राहुल भालेकर, रुद्र भालेकर, अमर अस्वले, आराध्या अस्वले, निष्ठा अस्वले, मयूर महाले, नील महाले, ॲड. नम्रता मांडवकर, ममता म्हात्रे, जितेंद्र सोनटक्के, भरत चिकणे, जनार्दन शेलार, रोहित धनगावकर, अनिकेत गायकवाड, ओमकार सोनटक्के, विशाल प्रसाद, कौस्तुभ कुंभार, प्रमोद जेना, यज्ञात पारठे, वरुण राजपुरा, रिटा कच्छार, खुशबू मौर्य, कोमल खंदारे, वैष्णवी मेहेत्रे व पूनम मिसाळ आदी उपस्थित होते.

स्वामी समर्थ मठातर्फे सैनिकांना मानवंदना

रसायनी : प्रेरणा जल्लोष आणि रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी समर्थ महाराज मठ, आळी आंबिवली येथे १२०० पणत्या लावून दीपोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भारतीय सैन्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी प्रत्येक सैनिक-एक पणती हा उपक्रम यंदाही सैनिकांना मानवंदना देऊन साजरा करण्यात आला. देशाच्या रक्षणासाठी अहोरात्र झटणाऱ्या प्रत्येक जवानाच्या त्यागाला आणि शौर्याला ही एक पणती अर्पण करण्यात आली. याप्रसंगी नागेश कदम, ओंकार काका, केदार भोईर आणि सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- घरकामासाठी अर्धवेळासाठी बाई पाहिजे. पगार- ५००० रुपये, संपर्क : ९८६७२१५४९५/८०९७२०५९३९
- शिवानी पेटशॉप अलिबाग/चोंढी/पेण येथे कामाकरीता कमीत कमी १२ वी पास मुलगी पाहिजे. संपर्क : ९२७२३८३४७६
- ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- ८७८८०२१५१०
- घर कामाला बाई/मुलगी पाहिजे. महिना पगार-१२,०००/- दिला जाईल. इच्छुक असणाऱ्याने खाली दिलेल्या नंबरवर कॉल करा. ७८७५७४७५३२, ८८०६१४९४२८. पत्ता - किहीम बीच, अलिबाग, रायगड ४०२२०८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

पालकांना दिवाळी फराळाचे वाटप

| माणगाव | प्रतिनिधी |

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचलित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात बुधवारी (दि.४) नोव्हेंबर दीपोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्युत रोषणाई, आकर्षक किल्ले प्रदर्शन, दिवाळी गीतांचे सूर, विद्यार्थ्यांची नृत्ये, फटाक्यांची आतषबाजी आणि दिवाळी फराळाची मेजवानी अशा विविध उपक्रमांनी विद्यालयाचा परिसर अक्षरशः प्रकाशमय झाला. प्रसाद शिरशिकर, निशा भादावकर, देवका मोरे, अमोल जाधव संतोष कदम यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.



यावेळी प्रसाद शिरशिकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापक कदम यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करून उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता विकसित होत असल्याचे सांगितले. या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. नंदकिशोर जोशी, डॉ. निलेश रेवगडे सुनील पाटील यांनी मार्गदर्शन करून विशेष कौतुक केले.

लक्ष्मीच्या रांगोळीतून दीपावलीचा मांगल्यपूर्ण सोहळा

| खांदा कॉलनी | वार्ताहर |

पनवेल दीपावलीच्या पहिल्या दिवशी लक्ष्मीपूजनाचा शुभमुहूर्त साधत शहरातील रांगोळी कलाकारांनी लक्ष्मीमातेची आकर्षक रांगोळी साकारली. विविध रंगांच्या छटांमधून साकारलेल्या लक्ष्मीमातेच्या रूपाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

रांगोळीतील कलात्मकता आणि सुबक मांडणीमुळे परिसरात दीपावलीचे मंगलमय वातावरण निर्माण झाले. लक्ष्मीच्या आगम नाचे प्रतीक असलेल्या या रांगोळीने सणाचा आनंद द्विगुणित केला.



साखर शाळेत दिवाळीनिमित्त विविध उपक्रम सादर



|अलिबाग | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा परिषद शाळा साखर येथे नुकतेच दिवाळीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा तसेच सांस्कृतिक वारसा पुढे चालू रहावा हा त्या मागील महत्त्वाचा उद्देश आहे. दिवाळीनिमित्त पणत्या रंगवणे तसेच आकाश कंदील बनवण्याचा उपक्रम घेण्यात आला.

रेश्मा भुकवार, सुनिता गोतकर, मुख्याध्यापक राजेंद्र पाटील, स्मिता चिखले यांनी विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे मार्गदर्शन करून प्रोत्साहित केले. विद्यार्थ्यांनी चांगल्या प्रकारे पणत्या रंगविल्या. गड किल्ल्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या अंगी बाणवण्यासाठी माती पासून किल्ला बनवण्याचा उपक्रम देखील राबविण्यात आला. सोहम साटविलकर, रिशांक निर्गुले रुहान नाखवा, तेज सारंग या विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखाली उत्तम अशी किल्याची प्रतिकृती बनवली. या सर्व उपक्रमांमध्ये सहभागी होऊन विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला.

स्वामी मठात भाविकांची मांदियाळी

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

दीपावलीच्या पहिल्या दिवसाचे औचित्य साधत पनवेल येथील गावदेवी परिसरातील स्वामींच्या मठात दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. पहाटेपासूनच स्वामींचे दर्शन घेण्यासाठी नागरिकांची ये-जा सुरू होती. दीपावलीच्या मंगलमय वातावरणात स्वामींचे आशीर्वाद घेऊन नव्या वर्षाची सुरुवात करण्यासाठी भाविकांनी मठात हजेरी लावली.



दीपावली हा आनंद, उत्साह आणि श्रद्धेचा सण असल्याने अनेक कुटुंबांनी एकत्र येत स्वामींचे दर्शन घेतले. महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच तरुण भाविकांची उपस्थिती लक्षणीय होती. दर्शनासाठी आलेल्या भाविकांमध्ये भक्तीमय वातावरण पाहायला मिळाले.

मठ परिसरात दिवाळीनिमित्त उत्साहाचे वातावरण होते. स्वामींच्या चरणी नतमस्तक होऊन कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. दिवाळीच्या पहिल्याच दिवशी गावदेवीतील स्वामी मठात झालेली भाविकांची गर्दी श्रद्धा आणि भक्तीभावाचे दर्शन घडवणारी ठरली.

माथेरान बाजारपेठ रोषणाईने सजली

| माथेरान | प्रतिनिधी |

सर्वांचा आवडता सण म्हणून दीपावलीमध्ये घरोघरी आकर्षक रांगोळ्या, दारासमोर आकाश कंदील तसेच गोड पदार्थ बनविले जातात. माथेरान हे एक रमणीय पर्यटनस्थळ असल्याने याठिकाणी दीपावलीच्या सुट्ट्या घालविण्यासाठी पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होते. यासाठी मुख्य बाजारपेठेमध्ये श्रीराम चौक ते गार्डनपर्यंत आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून सर्वत्र प्रसन्न वातावरणनिर्मिती झाली आहे. यासाठी नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी पुढाकार घेत यानिमित्ताने पर्यटकांनी खरेदीसाठी गर्दी केलेली पाहावयास मिळत आहे. व्यापारीवर्गा दुकाने सजवून ग्राहकांना सेवा देण्यात तत्पर दिसत आहेत. दस्तुरी नाक्यावर असणाऱ्या प्रवेशाच्या ठिकाणी रंगीबेरंगी विद्युत रोषणाई करून पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न केलेला दिसत आहे.



बाल मावळ्यांनी उभारला शिवकिल्ला

| चिरनेर | प्रतिनिधी |

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची व स्वराज्याच्या इतिहासाची प्रेरणा देणारे शिव किल्ले साकारण्यात ग्रामीण भागातील बाल सवंगडी मग्न आहेत. उरण तालुक्यातील चिरनेर मंदार संभाजी म्हात्रे यांच्या पुत्राच्या मार्गदर्शनाखाली त्याच्या बाल सवंगड्यांच्या मदतीने त्यांनी कल्पकतेतून एका प्रेरणादायी शिवकालीन शिव किल्ल्याची उभारणी केली आहे.

शिव किल्ल्याच्या निर्मितीसाठी परिसरात उपलब्ध असलेल्या दगड, माती, विटा व रंगांचा तसेच विविध सजावटीच्या साहित्याचा वापर करत, किल्ल्याची तटबंदी, प्रवेशद्वार, बुरुज, पायऱ्या व मावळे या बाल मावळ्यांनी शिव किल्ला उभारताना साकारले आहेत. त्यामुळे परिसराला शिवकालीन स्वरूप प्राप्त झाले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांविषयी प्रेम, आदर आणि त्यांचा महापराक्रम या ऐतिहासिक शिव किल्ल्यातून दिसून येत असून, ऐतिहासिक वारसा जपण्याची भावना देखील या मुलांनी बदलत्या जीवनशैलीत जपली आहे.



शिवराय प्रतिष्ठाने साकारला विशालगड

| खांदा कॉलनी | वार्ताहर |

दीपावली सणाचे औचित्य साधून नवीन पनवेल सेक्टर ७ येथे राजे शिवराय प्रतिष्ठानच्या वतीने दुर्गदर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने ऐतिहासिक विशालगडाची भव्य प्रतिकृती साकारण्यात आली असून, ती पाहण्यासाठी नागरिक आणि शिवप्रेमींची गर्दी होत आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांचा ऐतिहासिक वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचावा, तसेच मुलांमध्ये इतिहासाविषयी आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने प्रतिष्ठानने हा उपक्रम राबविला आहे. गडाची तटबंदी, बुरुज, प्रवेशद्वार आणि ऐतिहासिक वास्तूंची रचना यांची आकर्षक मांडणी करण्यात आली आहे. प्रतिकृती साकारताना गडाच्या ऐतिहासिक स्वरूपाची जपणूक करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.



दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये लहान मुलांसह पालकही या दुर्गदर्शन सोहळ्याला भेट देत आहेत. मोबाईल आणि आधुनिक मनोरंजनाच्या जगात रमणाऱ्या मुलांना प्रत्यक्ष गड-किल्ल्यांच्या इतिहासाची ओळख करून देण्याचा हा प्रयत्न कौतुकास्पद ठरत आहे. राजे शिवराय प्रतिष्ठानच्या या उपक्रमामुळे नवीन पनवेल परिसरात शिवकालीन इतिहासाचा जागर होत असून, दीपावलीच्या उत्सवाला ऐतिहासिक वारशाची सुंदर जोड मिळाली आहे.

ढोल-ताशा, पोवाड्याने जागविला शिवइतिहास | **पावनखिंडीच्या ऐतिहासिक प्रसंगाचे सादरीकरण**

वडाळे सरोवरात शिवमय वातावरण

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

दीपावलीच्या उत्साहात पनवेलमधील पेशवेकालीन वडाळे सरोवर परिसरात शिवमय वातावरण अनुभवायला मिळाले. तरुणाईच्या उत्स्फूर्त सहभागातून ढोल-ताशांचे सामूहिक वादन, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित पोवाडा आणि ऐतिहासिक प्रसंगांच्या नाट्यमय सादरीकरणाने सरोवर परिसर दुमदुमून गेला.

यावेळी तरुणांनी एकत्र येत ढोल-ताशांच्या तालावर सामूहिक वादन सादर केले. या वादनातून निर्माण झालेल्या जोशपूर्ण वातावरणाने उपस्थित नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्यगाथेवर आधारित पोवाड्याचे सादरीकरण करण्यात आले. पोवाड्यातील वीररसपूर्ण शब्दांनी उपस्थितांमध्ये शिवइतिहासाची आठवण जागवली.



कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरले ते पावनखिंडीच्या ऐतिहासिक प्रसंगाचे नाट्यरूप सादरीकरण. बाजीप्रभू देशपांडे यांच्या पराक्रमाची आणि स्वराज्यासाठी दिलेल्या बलिदानाची आठवण करून देणारा हा प्रसंग तरुण कलाकारांनी प्रभावीपणे उभा केला.या ऐतिहासिक प्रसंगांचे सादरीकरण पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. तरुणांच्या कलागुणांना आणि शिवइतिहासाची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या प्रयत्नांना उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

पारंपरिक ढोल-ताशांचा निनाद, पोवाड्याचा वीररस आणि पावनखिंडीचा थरार यामुळे पेशवेकालीन वडाळे सरोवर परिसरात काही काळ शिवकालीन इतिहासाचा अनुभव नागरिकांना घेता आला.

वंचित घटकांसोबत वाढदिवस साजरा

| पनवेल | प्रतिनिधी |

शिवशक्ती मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष रमेश गुडेकर यांच्या वाढदिवसानिमित्त मंडळाच्या वतीने सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. यानिमित्त आदिवासी वाड्यांवर जाऊन आदिवासी बांधवांना दिवाळीच्या फराळाचे वाटप करण्यात आले. वाढदिवसाचा आनंद केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता समाजातील वंचित घटकांसोबत साजरा करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. शिवशक्तीमित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी आदिवासी वाड्यांवर जाऊन फराळाचे वाटप केले.

निवडक

करंजाडेत मोबाईल चोरांचा धुमाकूळ

पनवेल : करंजाडे परिसरात तीन अज्ञात इसमांनी एका नागरिकाला अडवून त्याचा मोबाईल फोन आणि फोन-पेचा पासवर्ड जबरदस्तीने घेत पाच हजार रुपये काढून घेतल्याची घटना समोर आली आहे. ६० हजार रुपये किमतीचा मोबाईलही हिसकावण्यात आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. फिर्यादी अब्बासूद्दीन अलाउद्दीन हे वरचे ओवळे येथे राहतात. ते पळस्पे-जेएनपीटी महामार्गालगत करंजाडे येथे जेवणासाठी जात असताना तिघांनी त्यांना अडवले. त्यांच्याकडील मोबाईल फोन आणि फोन-पे पचा पासवर्ड जबरदस्तीने घेतला. त्यानंतर फोन-पेद्वारे त्यांच्या खात्यातून पाच हजार रुपये काढून घेतले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तीन अज्ञात इसमांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करीत आहेत.



निखिल म्हात्रे भारतीय सैन्यातून निवृत्त

अलिबाग : भारतीय सैन्यात २१ वर्षे देशसेवा करून सेवानिवृत्त झाले आहेत. मानी-भुते गावचे हवालदार निखिल राजाराम म्हात्रे यांचा सेवा निवृत्ती सोहळा शुक्रवारी (दि. ६) नोव्हेंबर रोजी मानी- भुते गावात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यांचे मायभूमीत आगमन होताच ग्रामस्थांनी फटाक्यांच्या आतषबाजी, ढोल-ताशांच्या गजरात आणि फुलांच्या वर्षावात त्यांचे जंगी स्वागत केले. निखिल यांनी २६ जून २००६ रोजी ते भारतीय सैन्यात भरती झाले होते. बेळगाव येथे एक वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण करून ते १४ मराठा लाईट इन्फंट्रीमध्ये दाखल झाले. सलग २१ वर्षे सेवा बजावून (दि.३१) ऑक्टोबर रोजी ते हवालदार पदावरून सेवानिवृत्त होऊन ते आपल्या गावी परत आले. त्यांनी ग्वालियर मध्य प्रदेश, ९ पोस्ट सियाचीन (लेह-लडाख), सेला रोड (सिक्कीम), UN-Mission विदेश (दक्षिण आफ्रिका-सुदान,काश्मीर नंगि टेकडी ४१ आरआर कुपवाडा (जम्मू-काश्मीर), गांधीनगर (गुजरात), कारगिल, सोनमर्ग, जम्मू गलवान घाटीआणि आसाम हरचुरा अरुणाचल प्रदेश टायगर हिल अशा आव्हानात्मक ठिकाणी सेवा बजावली. या सोहळ्याला सुहास पाटील, सुनील घासे, राजू पाटील, संजय कदम, श्वेता कदम, निखिल म्हात्रे यांची पत्नी व दोन मुली व त्याचे आई-वडील, भाऊ व परिवार उपस्थित होते यांच्यासह मान्यवर, ग्रामस्थ मानी भुते आणि मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. व कार्यक्रम यशस्वी करण्यात महेश म्हात्रे यांनी विशेष परिश्रम घेतले

बंद रेशनकार्ड पूर्ववत करण्याची मागणी

पनवेल : महागाईमुळे सर्वसामान्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. गरीब कुटुंबांना रेशनव्यवस्थेतून दिलासा द्यावा, अशी मागणी शिवसेना(उबाठा) पक्षाने केली आहे. पात्र केशरी शिधापत्रिकाधारकांना मोफत धान्य द्यावे, विनाचौकशी बंद केलेली पात्र रेशनकार्डे पूर्ववत सुरू करावीत, तसेच तांदूळ, गहू, साखर, खाद्यतेल आणि डाळ या पाच जीवनावश्यक वस्तू सवलतीच्या दरात उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे. यासंदर्भात पनवेलचे तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले आहे. रेशनकार्ड बंद करण्यापूर्वी संबंधित लाभार्थ्यांची योग्य पडताळणी करून त्यांना बाजू मांडण्याची संधी द्यावी. तांत्रिक कारणांमुळे बंद झालेल्या पात्र रेशनकार्डांची पुनर्तपासणी करून ती तातडीने सुरू करावीत, अशी मागणीही करण्यात आली.केवळ तांदूळ, गहू नव्हे, तर साखर, खाद्यतेल आणि डाळींच्या वाढत्या किमतींचाही सर्वसामान्यांना मोठा फटका बसत आहे. त्यामुळे रास्त भाव धान्य दुकानांमार्फत या पाच वस्तू सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यासाठी विशेष योजना लागू करावी. तसेच दुकानांमध्ये नियमित धान्यसाठा उपलब्ध देण्याचा आग्रह धरला आहे. याप्रसंगी दीपक निकम, रामदास पाटील, भरत पाटील, नितीन गावंड, ज्ञानेश्वर बडे, बबन फडके, शांताराम कुंभारकर, दत्ता फडके, शशिकांत भगत, जयंत पाखरे, संदीप घोगरे, आत्माराम लहाने आदी उपस्थित होते.





'शाळा वाचवा' अभियानातून शिक्षणाच्या राष्ट्रीयीकरणाची मागणी

वावोशी : रायगड जिल्ह्यातील सरकारी शाळांमध्ये पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, बाके, वीज आणि शैक्षणिक साहित्य यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे 'शाळा वाचवा' अभियानांतर्गत केलेल्या प्रत्यक्ष पाहणीत निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर इंडियन स्टुडंट्स मूव्हमेंटच्या वतीने (दि.६) नोव्हेंबर रोजी खालापूर येथील आदिवासी भवनात पत्रकार परिषद घेण्यात आली. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील विविध जिल्हा परिषद शाळांना भेटी देऊन शिक्षक, विद्यार्थी आणि नागरिकांकडून माहिती घेतली. शून्य वयापासून पदवीपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण, शिक्षणाचे खासगीकरण व बाजारीकरण बंद करणे, सर्वांना समान गुणवत्तेचे शिक्षण, वैद्यकीय व तांत्रिक शिक्षणाच्या समान संधी आणि राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान १५ टक्के निधीची शिक्षणासाठी तरतूद करावी, अशा मागण्या मांडण्यात आल्या. तसेच स्थानिक आमदार, खासदार आणि प्रशासनाने सरकारी शाळांची प्रत्यक्ष पाहणी करून पायाभूत सुविधांचा अभाव दूर करावा आणि आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली. शिक्षण हा प्रत्येकाचा घटनात्मक अधिकार आहे, बाजारातील वस्तू नाही. सरकारी शाळांचे संरक्षण आणि शैक्षणिक समानतेसाठी पालक, विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी शाळा वाचवा अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन इंडियन स्टुडंट्स मुव्हमेंटच्या वतीने करण्यात आले. याप्रसंगी ॲड. प्रकाश कदम, सविता सोनवणे कदम, राहुल माने, किरण केनी, विशाल पवार, संदीप जाधव उपस्थित होते.

अंबा नदीपात्रात उत्खननामुळे पुराचा धोका

। पाली । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यातील आरडेचीवाडी (हेदवळी), कानसळ आणि दहिगाव परिसरातील अंबा नदीपात्रात कथित अनधिकृत उत्खनन, बांधकामे आणि नदीकिनारी उभारण्यात येणाऱ्या संरक्षक भिंतींमुळे ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. नदीच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा निर्माण होऊन पावसाळ्यात पूरस्थिती गंभीर होण्याची शक्यता व्यक्त करत ग्रामस्थांनी प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. येत्या १५ दिवसांत ठोस कारवाई न झाल्यास व्यापक जनआंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

अंबा नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर उत्खनन सुरू असल्याचा, तसेच नदीच्या हद्दीत काही ठिकाणी बांधकामे करण्यात



वस्त्यांमध्ये पाणी शिरण्याची भीती

येत असल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. नदीलगत उभारण्यात येणाऱ्या वॉल कंपाऊडमुळेही नैसर्गिक जलप्रवाहावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नदीच्या प्रवाहाची दिशा बदलल्यास अतिवृष्टीच्या काळात नदीचे पाणी लगतच्या वस्त्यांमध्ये शिरून जीवित व मालमत्तेचे नुकसान होऊ शकते, अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

या प्रश्नावर पाटबंधारे आणि महसूल विभागाच्या भूमिकेमुळे ग्रामस्थांमध्ये अधिकच नाराजी पसरली आहे. नदीपात्रातील कथित अतिक्रमण व उत्खननाबाबत पाटबंधारे विभागाकडे विचारणा केली असता, कारवाईचे अधिकार तहसील कार्यालयाकडे असल्याचे सांगण्यात आल्याचा ग्रामस्थांचा दावा आहे. तर सुधागडचे तहसीलदार उत्तम कुंभार यांची भेट घेतली असता, नदीपात्राचा विषय पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत असल्याचे सांगण्यात आल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट केले.

दोन्ही विभागांकडून परस्परांकडे जबाबदारी निर्देशित केली जात असल्याने प्रत्यक्ष कारवाई करणार कोण, असा सवाल उपस्थित होत आहे. नियमबाह्य उत्खनन किंवा बांधकाम होत असल्यास त्याची तपासणी करण्यासाठी विभागांना आणखी किती वेळ लागणार, असा संतप्त प्रश्नही ग्रामस्थ विचारत आहेत.

संभाव्य पूरस्थिती आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेता पंधरा दिवसांच्या अल्टिमेटमनंतर प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे आरडेचीवाडी, हेदवळी, कानसळ आणि दहिगाव परिसरातील ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

धानकान्हे शाळेत दिवाळी कार्यशाळा संपन्न

। खांब । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील धानकान्हे प्राथमिक शाळेत मुलांना शालेय शिक्षणाबरोबरच व्यवसाय शिक्षणाचे धडे गिरवण्यासाठी दिवाळी उत्सवासाठी आकाश कंदील तयार करणे याबाबतची कार्यशाळा आनंददायी शनिवार उपक्रमातंर्गत मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आली. या दिवाळी कार्यशाळेत महेशकुमार जगताप यांनी सर्वप्रथम मुलांना आकाश कंदील तयार करण्याचे प्रात्यक्षिक व तसेच पणत्या सजावट प्रात्यक्षिक करून दाखवले. सदर कार्यशाळेत शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दत्तात्रेय हळदे, उपाध्यक्ष साक्षी तुपकर, तसेच सर्व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक तसेच शिक्षक उपस्थित होते.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

महिला उपजीविका उत्पादनांचे प्रदर्शन उत्साहात

। वावोशी । प्रतिनिधी ।

महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे, त्यांच्या अंगी असलेल्या कौशल्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि त्यांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्याच्या उद्देशाने मॅजिक बस इंडिया फाऊंडेशनच्या वतीने खोपोली-खालापूर येथील प्रोजेक्ट ऑफिसमध्ये महिला उपजीविका उत्पादनांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाला परिसरातील नागरिक, महिला आणि मान्यवरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत महिलांच्या कलाकौशल्याचे कौतुक केले.

मॅजिक बस इंडिया फाऊंडेशनच्या माध्यमातून खोपोली-खालापूर परिसरात



महिलांच्या उपजीविकेसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. महिलांना कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करणे, उत्पन्नाचे साधन निर्माण करून देणे तसेच त्यांच्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू आहे. या प्रदर्शनाला प्रमिला पाटील, मुख्याध्यापिका खालापूरकर, शाळेतील शिक्षकवृंद तसेच स्थानिक ग्रामस्थांनी भेट दिली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मॅजिक बसचे टीम सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

शांताराम करंजे सेवानिवृत्त

। खांब । प्रतिनिधी ।

शांताराम करंजे यांनी रिलायन्स कंपनीमध्ये सलग ३३ वर्षे प्रदीर्घ सेवा बजावून सेवानिवृत्त झाले आहेत. ११ जानेवारी १९९३ रोजी त्यांनी कंपनीमध्ये आपल्या नोकरीची सुरुवात केली होती. कंपनीतील बदलत्या कार्यपद्धती, तांत्रिक बदल आणि काळानुसार निर्माण झालेल्या विविध आव्हानांना सामोरे जात त्यांनी आपल्या अनुभवाच्या जोरावर कामाचा वेगळा ठसा उमटवला. तब्बल ३३ वर्षांच्या सेवाकाळात त्यांनी कर्तव्यनिष्ठा, आणि सहकार्य या गुणांच्या बळावर आपला सेवाप्रवास यशस्वीपणे पूर्ण करत (दि.३०) ऑक्टोबर रोजी त्यांच्या प्रदीर्घ सेवापर्वाची सांगता झाली.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

घोळवाडी पाड्यात साडी-चोळी वाटप

। पनवेल । प्रतिनिधी ।

दिवाळीचा आनंद समाजातील वंचित आणि गरजू घटकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने आदर्श सेवाभावी संस्थेच्या वतीने खारघर येथील घोळवाडी कातकरी आदिवासी पाड्यात भाऊबीज उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त पाड्यातील ६५ आदिवासी कुटुंबांना साडी-चोळी, मिठाई आणि दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे आदिवासी भगिनींच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. खारघर येथील टाटा रुग्णालयामागे असलेल्या घोळवाडी कातकरी पाड्यात आयोजित या कार्यक्रमास खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जोशी, यांनी परिश्रम घेतले.

सत्यजित पाटील महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित

। उरण । प्रतिनिधी ।

सामाजिक बांधिलकी जपत निस्वार्थ भावनेने समाजसेवेचा वसा जोपासणारे शिव प्रतिष्ठान करंजाडेचे संस्थापक अध्यक्ष सत्यजित पाटील यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेत आनंदी युनिव्हर्स फाऊंडेशनच्या वतीने प्रतिष्ठेच्या 'महाराष्ट्र भूषण २०२६' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुणे येथील पत्रकार भवनात विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला.

पाटील हे पनवेल तालुक्यातील केळवणे गावचे पुत्र आहेत. २०१७ पासून त्यांनी शिव प्रतिष्ठान करंजाडेच्या माध्यमातून



सामाजिक कार्याचा ध्यास घेत विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले आहेत. केवळ सामाजिक उपक्रमांपुरते मर्यादित न राहता पर्यावरण संवर्धन, पशुपक्ष्यांचे संगोपन आणि गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत अशा विविध क्षेत्रांत त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. पाटील यांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरविण्यात आल्याने करंजाडे, केळवणे, पनवेल आणि उरण परिसरातून त्यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून आनंद व्यक्त केला जात आहे.

बहिरेवाडीतील जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

महाराष्ट्रात यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने काही भागांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. याचा मोठा फटका ग्रामीण भागातील शेतकरी आणि ग्रामस्थांना बसत आहे. अशा परिस्थितीत दिवाळीचा सण गोड व्हावा आणि संकटग्रस्त कुटुंबांच्याही घरात आनंदाचा दिवा पेटावा, या सामाजिक भावनेतून मदतीचा हात पुढे केला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील बहिरेवाडी येथील गरजू आणि संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी पनवेलमधून दिवाळीनिमित्त जीवनावश्यक वस्तूंचे किट पाठविण्यात आले. राहुल गोगटे यांनी या उपक्रमासाठी पुढाकार घेतला. तब्बल २०० कुटुंबांना मदत पोहोचविण्याचे नियोजन करण्यात आले.

या मदत किटमध्ये अन्नधान्य, खाद्यतेल, मसाले यांसह दैनंदिन जीवनात आवश्यक असणाऱ्या वस्तूंचा समावेश करण्यात आला आहे.

या उपक्रमात प्रसाद सोमण, अभिजित सावंत, शैलेश जगनाडे, सुजन मुसळेकर, सुनील खबडे आदी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

■ राहुल गोगटे यांचा पुढाकार

विहूर आदिवासी वाडीत फराळ वाटप

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

सामाजिक बांधिलकी जपत पद्मदुर्ग व्यावसायिक मंडळाच्या वतीने मुरूड तालुक्यातील विहूर येथील आदिवासी वाडीत आदिवासी कुटुंबांसोबत दिवाळीचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. मंडळाच्या या सामाजिक उपक्रमाचे यंदा सलग पाचवे वर्ष होते. दिवाळीचा आनंद समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा या उद्देशाने दरवर्षी मंडळाच्या वतीने दिवाळी फराळ वाटपाचा उपक्रम राबविण्यात येतो. हा उपक्रम सातत्याने सुरू ठेवण्याचा मंडळाचा प्रयत्न राहील असे पद्मदुर्ग अरविंद गायकर यांनी सांगितले. या उपक्रमास अरविंद गायकर, देवेंद्र सत्वीडकर, दुर्वेश बोरडे, दीपक जोशी, किसन वाघमारे, सुरेश वाघमारे, महादेव वाघमारे, धर्मात तपीसर यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी आणि आदिवासी कुटुंबीय उपस्थित होते.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे सालोख तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री गणेश रामचंद्र म्हसे यांचेकडुन कायमची विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

मिळकत परिशिष्ट

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे.आर.प्रति	आकार रू.पै.
२९	४	०.१४.५०	१.५६

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा संस्थेचा बोजा, हक्क, हितसंबंध, अधिकार, कुळ वहिवाट, कब्जा साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, वारस हक्क, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत द्यावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास, वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या व्यवहाराची पुर्तता करतील. मुदतबाह्य हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कार्यालय पत्ता
१०३, पहिला मजला, पांडुरंग धाम,
रेल्वे गेट जवळ, नेरळ, ता. कर्जत,
जि. रायगड. मो.नं. ७७९८४३३८८८

सही/-
ॲड. कैलास अनंत बासरे

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या क्षेत्राची मिळकत, त्या मिळकतीचे मालक बिदिषा अरुण सेन यांचेकडुन विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे. आर.
७३	३	एकुण २.४६.०० पैकी ०.४२.००

सबब सदर वर वर्णनाच्या क्षेत्राच्या मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर वर वर्णन केलेल्या क्षेत्राची मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील क्षेत्राच्या मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून सदर क्षेत्राच्या मिळकतीचे मालकाबरोबर पूर्ण केला जाईल. माग्राहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/११/२०२६

ॲड.सी.बी.ओसवाल
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर - निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१०२०१.

निविदा सूचना
महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड, पिन नं-४०२१०७ यांचे कार्यालय
ई मेल पत्ता:- eehmpd@rediffmail.com eehmpd2021@gmail.com. **दूरध्वनी-०२१४३-२७८०११**
ई निविदा सूचना क्र. १२ सन २०२६-२७

कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे अनुभवी व सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील ई-प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावीत तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता, उत्तर कोकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, कळवा ठाणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय किंमत	इसारा रक्कम	काम पुर्ण करण्याचा कालावधी	निविदा संचाची किंमत	कंत्राटदाराचा वर्ग
१	हेटवणे धरणावरील इन्स्पेक्शन गॅलरी अंतर्गत साफसफाई करणे.	रु. १,५१,०६,८००/-	रु.१,५०,०००/-	६ महिने (पावसाळ्यासह)	रु.२,०००/- +३६०/- १८%GST) एकूण रू. २३६०/-	संदर्भित कामातील अनुभवी व सक्षम कंत्राटदार

ई निविदेचे वेळापत्रक

अ.क्र.		सुरूवात		समाप्ती	
		दिनांक	वेळ	दिनांक	वेळ
१	निविदा विक्री आणि डाऊनलोड करण्याचा कालावधी	दि. ०९.११.२०२६	११.००	दि. १६.११.२०२६	१८.००
२	बिड सबमिशन करण्याचा कालावधी	दि. ०९.११.२०२६	११.००	दि. १६.११.२०२६	१८.००
३	तांत्रिक लखोटा उघडणेचा दिनांक व स्थान	दि. १७.११.२०२६	१८.००	कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली ता. पेण, जि. रायगड	

खालील ठिकाणी ई- निविदा बाबत सर्व माहीती उपलब्ध आहे.
१) संकेतस्थळ http://mahatenders.gov.in
(सदर निविदे सुचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
२) कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली-पेण कार्यालयातील सूचना फलक.
३) जर कंत्राटदारांना निविदेबाबत काही शंका असतील तर त्यांनी पोर्टलमध्यम दिलेल्या Seek Clarification पर्यायाद्वारे संपर्क साधावा. निविदेबाबत कोणतीही शंका उपस्थित करण्याची शेवटची तारीख १३.११.२०२६ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत असेल.
जा.क्र. हेमप्रवि/लेशा-१/ई-निविदा/२४५१/२०२६

हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली
ता.पेण, जि. रायगड,
दिनांक :- ०४/११/२०२६

सही/-
(दि.का. राजभोज)
कार्यकारी अभियंता,
हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली
ता.पेण जि.रायगड

प्रोसेस जमा रू. नि : ७/ड

जाहीर नोटीस

अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात,
दिवाणी चौकशी अर्ज १४७/२०२६

श्री. विलास पांडुरंग पाटील, ...अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही ...सामनेवाले

ज्याअर्थी कै. अरूण पांडुरंग पाटील, हे अलिबाग येथे तारीख ३१/०३/२०२६ रोजी मयत झाले असून, त्यांचे नावे जिल्हा रायगड, तालुका अलिबाग येथील ग्रामपंचायत चेंढरे हद्दीतील गौरीनंदन, सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, डि विंग मधील मालमत्ता क्रमांक १४७४/२ पैकी तळमजला मधील निवासी गाळा नंबर २, क्षेत्र ६२६ चौरस फूट बिल्टअप क्षेत्राचा निवासी गाळा ही स्थावर मिळकत कै. अरूण पांडुरंग पाटील यांच्या मालकीची आहे. सदर मिळकतीकरिता कै. अरूण पांडुरंग पाटील यांचे पश्चात अर्जदार श्री. विलास पांडुरंग पाटील हे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून मिळणेकरिता अर्जदार यांनी अलिबाग कोर्टात वरीलप्रमाणे अर्ज दाखल केला आहे. सबब तसा वारस दाखला देणेसंबधी कोणाच्या काही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत अथवा तारीख ०१/१२/२०२६ रोजी कोर्टामध्ये हजर होवून लेखी स्वरुपांत मे. कोर्टात दाखल कराव्यात अन्यथा अर्जदार यांस वारस दाखला दिला जाईल.

आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी माझ्या सहिनीशी व न्यायालयाचे सहिनीशी दिली.

कनिष्ठ लिपिक
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
स्तर अलिबाग- रायगड

कोर्टाचा शिक्का

अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ
अलिबाग-रायगड

निवडक

करांटे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन



उरण : मार्शल आर्ट क्षेत्रातील मानाचे समजले जाणारे १४ वे वार्षिक राष्ट्रीय कराटे प्रशिक्षण शिबीर यंदा रायगड जिल्ह्यात करण्यात आले आहे. विजय विकास सामाजिक संस्था आणि महाराष्ट्र यांच्या मुख्य आयोजनातून आणि इंटरनॅशनल, इंडिया, शोतोकान कराटे डो स्पोर्ट्स असोसिएशन, रायगड मिक्स बॉक्सिंग असोसिएशन आणि इंडियन मिक्स बॉक्सिंग फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर दि.१२ ते १५ नोव्हेंबर या कालावधीत पेण तालुक्यातील कामाली-कुंभार्ली येथील श्री बल्लाळेश्वर फार्म हाऊस येथे आयोजित करण्यात आले आहे. रायगड जिल्ह्याबाहेरील विद्यार्थ्यांसाठी गुरुवारी (दि.१२) सकाळी ९ वाजता उरण येथील टाऊनशिप स्टाफ क्लब येथे रिपोर्टिंग ठेवण्यात आले आहे. या चार दिवसीय निवासी शिबिरात सिनियर मास्टर्सच्या मार्गदर्शनाखाली फुल कॉन्टॅक्ट कराटे, सेमी कॉन्टॅक्ट, ज्युडो, मिक्स बॉक्सिंग, वेपन्स, जुजुत्सू, सिनियर काताज् यांचे सखोल प्रशिक्षण दिले जाणार असून मुलींसाठी विशेष स्व-संरक्षण प्रशिक्षण, प्रशिक्षक प्रशिक्षण आणि मैत्रीपूर्ण स्पर्धा परीक्षाही घेतली जाणार आहे. या शिबिरामध्ये राहण्याची सोय, अंतर्गत वाहतूक, नाश्ता, जेवण, प्रमाणपत्र, स्पर्धा, बक्षिसे, प्रथमोपचार आणि मनोरंजन कार्यक्रमाचा समावेश आहे.

नील नाईकच्या दोन शतकी भागीदाऱ्या

मुंबई : नील नाईकच्या दोन शतकी भागीदाऱ्यांमुळे सोव्हेनियर क्रिकेट क्लबने अजित नाईक स्मृती १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत शनिवारी झालेल्या उपउपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत दणदणीत विजय मिळवला. वरळी स्पोर्ट्स क्लबने आयोजित केलेल्या या स्पर्धेतील लढतीत सोव्हेनियरने एमआयजी क्रिकेट क्लबचा २४९ धावांनी पराभव केला. मुंबई क्रिकेट संघटनेच्या मान्यतेने होत असलेल्या या स्पर्धेतील वरळी स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावरील सामन्यात नीलने समर्थ महाडिकसह दुसऱ्या विकेटसाठी १५९ चेंडूंत १३४ धावांची भागीदारी केली. त्यानंतर नीलने स्वराज मोरेसह अवघ्या ५३ चेंडूंत १०८ धावांची भागीदारी केली. त्याचबरोबर एमआयजीला षटकांची गती राखता न आल्यामुळे सोव्हेनियरच्या धावसंख्येत ५४ दंड धावांची भर पडली. राजवीर काशीदने एमआयजीचा डाव ९८ धावांत गुंडाळला. रुद्र पाबळे आणि ईसा दिवकर यांनी १५२ चेंडूंत १६८ धावांची सलामी दिली. त्यामुळे अंजुमन इस्लाम इन्स्टिट्यूटने माटुंगा जिमखानाविरुद्ध २९० धावा केल्या. त्यानंतर माटुंगा जिमखान्याला १९१ धावांत रोखत ९९ धावांनी विजय मिळवला. स्पर्धेत आता उपांत्यपूर्व फेरीच्या लढती होतील. हे सामने दोन दिवसांचे असून, ९ आणि १० नोव्हेंबरला खेळवण्यात येतील.



गंभीरच्या समर्थनासाठी गावस्कर धावले

नवी दिल्ली : भारताचे माजी क्रिकेटपटू सुनील गावस्कर हे भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि कर्णधार शुभमन गिल यांच्या समर्थनार्थ पुढे आले आहेत. न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात केएल राहुलला त्याच्या नेहमीच्या एक क्रमांकाच्या खाली फलंदाजीला पाठवण्यात आले होते. त्याऐवजी अक्षर पटेलला पाचव्या क्रमांकावर फलंदाजीसाठी पाठवण्यात आले, या निर्णयामुळे गंभीर-गिल यांच्यावर मोठ्या प्रमाणात टीका झाली, मात्र गावस्कर यांनी त्यांचा पाठपुरावा केला आहे. वेलिंग्टन येथे खेळल्या गेलेल्या या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारतासमोर १३५ धावांचे लक्ष्य होते. भारताची ३९ धावसंख्येवर तिसरी विकेट पडली असता, संघ व्यवस्थापनाने राहुलच्या फलंदाजी क्रमांकात बदल केला. त्यांनी अक्षरला पाचव्या क्रमांकावर फलंदाजीसाठी पाठवले. त्यानंतर सोशल मीडियावर गंभीरबद्दल टीका सुरू झाल्या. यावर गावस्कर म्हणाले की, त्यावेळी गोलंदाजांची लय बिघडवण्यासाठी अक्षरला पाचव्या क्रमांकावर पाठवणे हा एक निर्णय योग्य होता. जर डावखुरा फलंदाज फलंदाजीला आला, तर गोलंदाजांना अवघड जाईल, कारण त्यांना आपली लाईन आणि लेंथ बदलावी लागेल. असे करण्याच्या प्रयत्नात उजव्या हाताच्या फलंदाजाविरुद्ध गोलंदाजाची लय बिघडू शकते. यामुळे धावा काढण्याच्याही अधिक संधी निर्माण होतात, असे गावस्कर म्हणाले.



न्यूझीलंड 'अ' विरूद्ध मोठी आघाडी

वेलिंग्टन : भारत 'अ' विरुद्ध न्यूझीलंड 'अ' संघात सध्या तिसरा अनधिकृत कसोटी सामना सुरु आहे. या सामन्यात दुसऱ्या दिवस अखेर भारतीय संघाने मोठी आघाडी घेण्यात यश मिळवले. भारताने पहिल्या डावात साडेचारशे धावांचा टप्पा ओलांडला असून, दुसऱ्या दिवशी साई सुदर्शन, ध्रुव जुरेल, तिलक वर्मा, वॉशिंग्टन सुंदर या सर्वांनीच दमदार फलंदाजी केली. या सामन्यात पहिल्याच दिवशी यशस्वी जैस्वालने शतक केले होते. तो १०२ धवांवर बाद झाला होता. दुसऱ्या दिवशी भारताने २ बाद २२७ धावांपासून खेळायला सुरुवात केली. यावेळी साई सुदर्शन ७७ धावांवर, तर ध्रुव जुरेल १२ धावावंर नाबाद होता. दोघांनी दुसऱ्या दिवशी सुरुवात चांगली केली. परंतु, सुदर्शन शतकाकडे वाटचाल करत असताना ८८ धावांवर बाद झाला. त्यानंतर ध्रुव जुरेलला तिलक वर्माची साथ मिळाली. जुरेलने या डावातही अर्धशतक केले. परंतु, तो ७१ धावांवर झेलबाद झाला. त्यानंतर तिलक वर्मा चांगल्या लयीत खेळत असताना त्याला आधी रवींद्र जडेजाने साथ दिली. त्यानंतर जडेजा २५ धावांवर बाद झाला. त्यानंतर वॉशिंग्टन सुंदर तिलकसोबत दुसऱ्या बाजूने भक्कमपणे उभा राहिला. दोघांनीही अर्धशतके करताना भारताला साडेचारशे धावा पार करून दिल्या. तिलक शतकाकडे वाटचाल करत होता. मात्र, वॉशिंग्टन सुंदरचे अर्धशतक झाल्यानंतर भारताने लगेचच डाव घोषित केला.

ठाण्यात रायगडचा डंका!

|| चित्रलेखा पाटील पुरस्कृत संघाची दमदार कामगिरी || जीटीसी चषकावर युवी स्पोर्ट्सचा कब्जा

| संतोष राऊळ |
| अलिबाग |

ठाण्याच्या क्रिकेट मैदानावर रायगडच्या युवी स्पोर्ट्स् अलिबाग एनएम संघाने आपल्या खेळाचा दबदबा निर्माण करत जीटीसी ठाणे चषकाच्या पहिल्याच हंगामात जेतेपदाला गवसणी घातली. ट्रिशा स्पोर्ट्स आयोजित या दिवस-रात्र क्रिकेट स्पर्धेत आठ संघांनी सहभाग घेतला होता. मात्र, अंतिम सामन्यात क्लिअर कट स्ट्रायकर्सला धूळ चारत चित्रलेखा पाटील पुरस्कृत युवी स्पोर्ट्स् अलिबाग एनएम रायगड संघाने विजेतेपदावर आपले नाव कोरले. ठाणे जिल्ह्यात रायगडचा झेंडा उंचावणाऱ्या या संघाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



दि. ४ ते ६ नोव्हेंबरदरम्यान पार पडलेल्या या स्पर्धेचा अंतिम सामना डोंबिवली येथील निलजे क्रिकेट मैदानावर रंगला. युवी स्पोर्ट्स् अलिबाग एनएम रायगड आणि क्लिअर कट स्ट्रायकर्स यांच्यात झालेल्या या सामन्यात युवी स्पोर्ट्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. सलामीवीर कबीर सिंग आणि किरण पवार यांनी पहिल्याच षटकात चौकार-षटकारांची आतषबाजी करत तब्बल २४ धावा कुटल्या आणि संघाला धडाकेबाज सुरुवात करून दिली. तिसऱ्या षटकात ओम पाटीलने किरण पवारला १० चेंडूंत १६ धावांवर पायचित केले. त्यानंतर कबीर सिंगला साथ देण्यासाठी आलेल्या अक्षय पवारने षटकाराने सुरुवात केली; मात्र, सूर्याच्या गोलंदाजीवर तो ३ चेंडूंत १० धावा करून बाद झाला. त्यापाठोपाठ ऋतिक पाटीलही सूर्याच्या गोलंदाजीवर ३ चेंडूंत ६ धावा करून झेलबाद झाला. अमित पांडेने त्याचा अप्रतिम झेल टिपला. त्यानंतर योगेश पवारच्या साथीने कबीर सिंगने आक्रमक फलंदाजी सुरू ठेवली. शेवटच्या षटकात चौकार-षटकारांची आतषबाजी करत युवी स्पोर्ट्सने ५ षटकांत ३ बाद ८१ धावांचा डोंगर उभा केला. कबीर सिंगने अवघ्या १३ चेंडूंत ३८ धावा केल्या, तर योगेश पवार २ चेंडूंत ८ धावा करून नाबाद राहिला.

८२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी क्लिअर कट स्ट्रायकर्सकडून नागेश वाडेकर आणि सूरज केने सलामीला उतरले. युवी स्पोर्ट्सचा आर्यन भोईर याने पहिल्याच षटकात अवघ्या ८ धावा देत प्रतिस्पर्ध्यांना रोखले. मयूर वाघमारे यानेही आपल्या षटकात फलंदाजांना जखडून ठेवले. त्याच्या षटकात सूरज केनेचा झेल सुटला; मात्र, आर्यन भोईरने तिसऱ्या षटकात पुन्हा एकदा कमाल दाखवत कबीर सिंगच्या हातून सूरज केनेला २८ धावांवर झेलबाद केले. त्यानंतर कृष्णा पवार मैदानात उतरला. दोन षटकांत ४४ धावांची गरज असताना करण पाटीलने चौथे षटक टाकले. त्याच्या तिसऱ्याच चेंडूवर नागेश वाडेकर ९ धावांवर धावबाद झाला. त्यापाठोपाठ करण पाटीलने ऋतिक पाटीलच्या हातून कृष्णा पवारला ७ धावांवर झेलबाद करत स्ट्रायकर्सला आणखी एक धक्का दिला. त्यामुळे युवी स्पोर्ट्सने सामन्यावरील पकड मजबूत केली.

शेवटच्या षटकात स्ट्रायकर्सला विजयासाठी ३६ धावांची गरज होती. प्रत्येक चेंडूवर षटकार मारण्याची गरज असताना मुन्ना शेखने पहिल्याच चेंडूवर चौकार ठोकला आणि स्ट्रायकर्सच्या विजयाच्या आशा संपुष्टात आल्या. मुन्ना शेखने १६, तर अश्रफ खानने ६ धावा करून नाबाद राहत चौकार-षटकार मारण्याचा प्रयत्न केला; मात्र, स्ट्रायकर्सचा डाव ५ षटकांत ३ बाद ६७ धावांवरच थांबला. त्यामुळे क्लिअर कट स्ट्रायकर्सला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले आणि जीटीसी ठाणे चषकाच्या पहिल्या हंगामाचे विजेतेपद युवी स्पोर्ट्स् अलिबाग एनएम रायगडने पटकावले.

या स्पर्धेत किरण पवार याला मालिकावीर, तर कबीर सिंग याला उत्कृष्ट फलंदाजाचा पुरस्कार मिळाला. संघाच्या या शानदार यशाबद्दल सर्व खेळाडूंसह संघमालक चित्रलेखा पाटील, संघ व्यवस्थापक साई पाटील आणि कर्णधार अंगद पाटील यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

आशिया चषकात भारताचा पराभव

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

१९ वर्षांखालील आशिया चषक स्पर्धेतील साखळी फेरीत रविवारी (दि.८) भारतीय संघाला पाकिस्तानविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला. शेवटपर्यंत रोमांचक झालेल्या या सामन्यात पाकिस्तानने ३ गडी राखून विजय मिळवला. त्यामुळे पाकिस्तानने सलग दुसऱ्या विजयासह उपांत्य फेरीतील स्थान जवळपास पक्के केले आहे. मात्र, आता भारताला उपांत्य फेरीत पोहोचायचे असेल, तर साखळी फेरीतील तिसऱ्या आणि अखेरच्या सामन्यात युएईला पराभूत करावेच लागणार आहे. जर १० नोव्हेंबरला होणारा हा सामनाही भारतीय संघ पराभूत झाला, तर मात्र भारताचे आव्हान संपेल.



रविवारी झालेल्या या सामन्यात भारताने पाकिस्तानसमोर २०९ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग पाकिस्तानने ४८.१ षटकात ७ गडी गमावत पूर्ण केले. सामन्यात पाकिस्तानकडून उस्मान खान आणि जहांगीर बिलाल यांनी डावाची सुरुवात केली होती. मात्र, जहांगिर ५ धावांवर बाद झाला, तर उस्मान खान १६ धावांवर बाद झाला. १३ व्या षटकात अब्दुल कादीर २० धावांवर त्रिफळाचीत झाला. तर, कर्णधार फरहान युसफ २ धावांवर बाद झाला. अहमद हुसैनही ८ धावांवर पायचीत झाला. मात्र, त्यानंतर हसनैन अब्बास दारला सोबत घेऊन यष्टीरक्षक फलंदाज हमझा जहूरने कमालीची फटकेबाजी केली. यादरम्यान जहूरने अर्धशतकही केले. अखेर त्यांची १०७ धावांची भागीदारी हसनैनला ३८ धावांवर मनल चौहाने बाद करत तोडली. मात्र, ४९ व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर चौकार ठोकत जहूरने शतक पूर्ण केले आणि यासोबतच पाकिस्तानचा विजय निश्चित केला. जहूरने १०८ चेंडूत १० चौकार आणि ३ षटकारांसह नाबाद १०० धावांची खेळी केली.

तत्पूर्वी, भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण भारताता डाव ४६.३ षटकातच २०८ धावांवर संपला. भारताने कर्णधार लक्ष्य रायचंदानी (०), व्हीके विनित (८) आणि यशवर्धन चौहान (१) यांनी स्वस्तात विकेट्स गमावल्या. आर्यवीर सेहवागने २२ धावांची झुंज दिली.

अर्जुन राजपूत मात्र खंबीरपणे भारतीय संघासाठी उभा राहिला. त्याने अन्वय द्रविड (१०) आणि मनल चौहान (११) यांच्यासोबत चांगल्या भागीदाऱ्या केल्या. अर्जुनने शतक ठोकत भारतीय संघाला १७० धावांपर्यंत पोहचवले. त्याने १०७ धावा केल्या. पुढे काव्य पटेलने २३ धावांची खेळी केली. त्यामुळे भारतीय संघ २०० धावांचा टप्पा पार करता आला.

हार्दिक-अर्शदीपच्या ट्रेड डीलवर शिक्कामोर्तब

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

आयपीएल २०२७ साठी सर्वात मोठी ट्रेड डील होणार आहे. हार्दिक पांड्याच्या बदल्यात अर्शदीप सिंग मुंबई इंडियन्समध्ये येणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई आणि पंजाबने हार्दिक-अर्शदीप ट्रेड करण्याचे ठरवले आहे, याची कागदी कारवाई देखील पूर्ण झाली आहे आणि आता फक्त बीसीसीआयकडून अधिकृत मंजुरी मिळणे बाकी आहे.



अहवालानुसार, मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्स फ्रँचायझीने कागदी कारवाई पूर्ण करून बीसीसीआयकडे सोपवली आहे. हार्दिकच्या बदल्यात केवळ अर्शदीपच मुंबई इंडियन्समध्ये सामील होणार की आणखी कोणी, हे अजून पूर्णपणे स्पष्ट झालेले नाही; कारण अर्शदीपसोबत ऑलराउंडर विष्णु विनोद देखील मध्ये सामील होऊ शकतो, अशी बातमी आहे. दरम्यान, या ट्रेड डीलवर हार्दिक आणि अर्शदीप दोघांनीही आपापली संमती दिल्याचे सांगण्यात येत आहे. हार्दिक सध्या दुखापतग्रस्त असून २०२६ नंतर त्याने कोणताही व्यावसायिक क्रिकेट सामना खेळलेला नाही. अनेक आठवड्यांपासून अशा अफवा येत होत्या की चेन्नई सुपर किंग्सपासून कोलकाता नाईट रायडर्स आणि अगदी दिल्ली कॅपिटल्स देखील हार्दिकला ट्रेड करण्यात स्वारस्य दाखवू शकतात. परंतु आता हे जवळपास निश्चित झाले आहे की हार्दिक २०२७ मध्ये पंजाब किंग्सच्या जर्सीमध्ये दिसणार आहे.

पाटीदारची आशिया चषकातून माघार

| नवी दिल्ली | प्रतिनिधी |



बीसीसीआयने दि.१९ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या रायझिंग स्टार्स आशिया कपसाठी भारतीय संघात बदल केला आहे. रजत पाटीदारने बीसीसीआयसमोर आपली स्थिती स्पष्ट करताना सांगितले की, तो सध्या दुखापतीशी संघर्ष करत आहे, त्यामुळे त्याला आगामी स्पर्धेतून बाहेर ठेवले जावे. दरम्यान, रजत पाटीदारला रायझिंग स्टार्स आशिया चषकात भारतीय संघाचा उपकर्णधार बनवण्यात आले होते; तर, तिलक वर्मा संघाचे नेतृत्व करत आहे. त्याला इंडिया 'अ'च्या संघात आयुष बडोनीने रिप्लेस केले आहे. बडोनी सध्या उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहेत. रणजी चषकात आतापर्यंत ४ सामने खेळून त्यांनी ५५९ धावा केल्या आहेत. आयुषच्या बॅटमधून दोन द्विशतकेही निघाली आहेत. दुसरीकडे, रिंकू सिंह यांची संघाचे नवीन उपकर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या संघात अभिषेक शर्मा आणि वैभव सूर्यवंशी यांचाही समावेश आहे.

कोपरखैरणेत रंगला कबड्डीचा थरार

| ठाणे | प्रतिनिधी |



ठाणे जिल्हा कबड्डी असो. ने रा.फ. नाईक स्पोर्टस् व ग्रीफिन जिम. यांच्या संयुक्त सहकार्याने कोपरखैरणे येथील रा.फ. नाईक शाळेच्या पटांगणावर किशोर व किशोरी गट कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी किशोर गटाच्या अंतिम सामन्यात एकता मंडळ काल्हेर यांनी ओम् वर्तकनगर संघावर चुरशीच्या लढतीत ४१-३९ अशी मात करीत विजेतेपदाचा चषक पटकाविला. पूर्वार्धात २२-२० अशी एकताकडे आघाडी होती. दोन्ही संघानी तोडीसतोड खेळ करीत पूर्वार्धात १-१ लोण देत सामन्यातील चूरस वाढविली. ओम् वर्तकनगरने उत्तरार्धात दुसरा लोण देत सामन्यात रंगत आणली. मात्र, एकता संघाने बोनस गुण घेण्यावर भर देत आपला विजय साकारला. त्यांनी पूर्वार्धात ७, तर उत्तरार्धात ९ असे १६ बोनस गुण मिळविले, तर पराभूत संघाने ३-३ असे अवघे ६ बोनस वसुल केले. त्यामुळे उत्तरार्धात दुसरा लोण देऊन देखिल ओम् वर्तकनगर संघाला पराभवाचा सामना करावा लागला. किशोरी गटाच्या अंतिम सामन्यात ज्ञानविकास मंडळाने स्व. राकेशदादा म्हात्रे संघाला २६-२५ असे चकवित या गटाचा चषक उंचावला. वैभवी सिंग, पल्लवी सपकाळ यांनी आक्रमक सुरुवात करीत ज्ञानविकासला १६-०९ अशी महत्वपूर्ण आघाडी घेऊन दिली. मात्र, विश्रांतीनंतर शुभा शिंदेने धुव्वादार खेळ करीत संघाला विजयाच्या समीप नेले. परंतु, वेळेचे गणित साधता न आल्याने त्यांचा पराभव झाला.

गुरुकुल तायक्कांदो अॅकॅडमीची दमदार कामगिरी **साई जाधवची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड**

रायगडसह मुंबईच्या शिरपेचात मानाचा तुरा

| रसायनी | प्रतिनिधी |

राज्यस्तरीय शालेय तायक्कांदो स्पर्धेत गुरुकुल तायक्कांदो अॅकॅडमीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. यावेळी एक सुवर्णपदक आणि ३ कांस्यपदकांची कमाई केली. तसेच, या स्पर्धेत १९ वर्षांखालील वयोगटातील ५९ ते ६३ किलो वजन गटात सुवर्णपदक पटकाविणाऱ्या साई जाधव याची आगामी राष्ट्रीय शालेय तायक्कांदो स्पर्धेसाठी निवड झाली असून, रायगडसह मुंबई विभागाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला.



या राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने आणि तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या तांत्रिक सहकार्याने करण्यात आले होते. १७ वर्षांखालील वयोगटाच्या स्पर्धा अकोला येथील मूर्तिजापूर येथे दि.७ ते ८ ऑक्टोबर दरम्यान, तर १४ व १९ वर्षांखालील वयोगटाच्या स्पर्धा अकोट येथे दि.२ ते ४ नोव्हेंबर या कालावधीत पार पडल्या. या स्पर्धेत राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, कोल्हापूर, लातूर, छत्रपती संभाजीनगर आणि अमरावती या आठ विभागांतील गुणवंत खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेत गुरुकुल तायक्कांदो अॅकॅडमीच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. पदकविजेत्यांमध्ये १९ वर्षांखालील वयोगटात साई जाधव याने सुवर्णपदक, तर राज जाधव (५१ ते ५५ किलो) आणि ओमकार चव्हाण (७८ किलोवरील) यांनी कांस्यपदक पटकाविले. तसेच, १७ वर्षांखालील वयोगटात श्रवण भोसले (३८ ते ४१ किलो) याने कांस्यपदक मिळविले. आर्या माने हिने ३५ किलोखालील वजन गटात सहभाग नोंदविला.

या स्पर्धेतील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे साई जाधव याची राष्ट्रीय शालेय तायक्कांदो स्पर्धा २०२६-२७ साठी निवड झाली आहे. १९ वर्षांखालील मुलांच्या गटात मुंबई विभागातून राज्यस्तरावर सुवर्णपदक मिळवून राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेला तो एकमेव खेळाडू ठरला आहे. राष्ट्रीय स्पर्धा २६ ते ३० नोव्हेंबर २०२६ दरम्यान रांची, झारखंड येथे होणार असून, या स्पर्धेत साई जाधव महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)